अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १३८ । रविवार १ मार्च २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## 'आम्हाला वाचवा' इराणमध्ये अडकलेल्या भारतीय विद्यार्थिनीची केंद्र सरकारला विनंती



तेहरान : युद्धामुळे इराणच्या अनेक शहरांमध्ये भयावह परिस्थिती आहे. युद्धाने प्रभावित असलेल्या अनेक भागांमध्ये भारतीय विद्यार्थी अडकले आहेत. या विद्यार्थ्यांनी व्हिडीओ जारी करत भारत सरकारकडे मदतीची मागणी केली आहे. विशेष म्हणजे एका विद्यार्थिनीने लाईव्ह एअरस्टाईक होत असताना व्हिडीओ बनवला आहे. इराणमध्ये आकाशात क्षेपणास्त्र फिरताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी या क्षेपणास्त्रांचा हल्लादेखील जमिनीवर होत आहे. त्यामुळे तिथे अनिश्चित असं वातावरण निर्माण झालं आहे. त्यामुळे विद्यार्थिनीने भारत सरकार आणि देशाच्या परराष्ट्र मंत्रालयाला आपली या संकटातून सुटका करण्याची विनंती केली आहे. परिस्थिती आणखी चिखळण्याआधी आम्हाला इथून सुरक्षित बाहेर काढा, अशी विनंती विद्यार्थिनीने केली आहे.

## महत्वाचे..

### परदेशातील महाराष्ट्रीयन नागरिकांसाठी सुरक्षा ॲडव्हायझरी जारी

इराण आणि इस्रायलमध्ये तणाव निर्माण झाला आहे. युद्धाला सुरुवात झाल्यानं जगात चिंताजनक परिस्थिती आहे. या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या संबंधित दूतावासांनी तेथे वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांसाठी सुरक्षा ॲडव्हायझरी जारी केली आहे. या अनुषंगाने पॅलेस्टाईन (राम ल्ला), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद) कुवैत, बाहरीन, मस्कत, जॉर्डन आणि संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी) येथे वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी सतर्क राहावे, अनावश्यक हालचाल टाळावी आणि स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशातील भारतीय दूतावासांच्या २४ ७ हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधावा. दूतावास नियमितपणे परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक सूचना जारी करत आहेत

# इराणने ५ देशांवर मिसाईल्स डागल्या!

## अमेरिकेला प्रत्यूत्तर : यूएईपासून अबूधाबी, कुवेत, कतार, बहरीनपर्यंत हल्ले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

तेहरान : अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला केला आहे. अणु करारावरून अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावानंतर हा हल्ला झाला आहे. शनिवारी सकाळपासून इस्रायलने इराणची राजधानी तेहरानमध्ये क्षेपणास्त्रांद्वारे हल्ला केला. या हल्ल्यांमुळे तेहरानमध्ये स्फोटांचे आवाज येत असून, आकाशात धूर पसरला आहे. हल्ल्यानंतर इराणने आक्रमक प्रतिक्रिया दिली. इस्रायलसह यूएई, अबुधाबी, कुवेत, कतार, बहरीनवर मिसाईल डागल्या.

इराणमधील युद्धाचे जगभरात पडसाद उमटण्याची शक्यता आहे. इस्रायल आणि अमेरिकेच्या मिसाईल हल्ल्यानंतर इराण आक्रमक झाला आहे. इराणने इस्रायलसह यूएई, अबुधाबी, कुवेत, कतार, बहरीनवर मिसाईल डागल्या आहेत. अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्याला इराणकडून



प्रत्युत्तर देण्यात आले. इराणचे बहरिनमधील अमेरिकेच्या तळांवर हल्ले सुरु केले आहेत. इराणच्या हल्ल्यानंतर आखाती देशांनी हवाई हद्द बंद केली आहे. इस्रायलच्या संरक्षण मंत्र्यांनीही हल्ल्यांना दुजोरा दिला आहे. तर प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून हा हल्ला

### जागतिक युद्धाचा धोका

**इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखालील कारवाईत इराणची राजधानी तेहरानमध्ये क्षेपणास्त्र हल्ले झाल्याचा दावा केला जात आहे. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांच्या मुख्यालयाजवळ स्फोट झाल्याचे वृत्त आहे. संरक्षण तज्ज्ञ मेजर जनरल अनिल बाम यांनी इशारा दिला की, रशिया आणि चीन जर इराणच्या बाजूने सक्रिय झाले तर परिस्थिती जागतिक युद्धाकडे झुकू शकते.**

### स्फोटात ५१ शाळकरी मुलींचा बळी

**इस्रायल-अमेरिकेने इराणमधील साधारण ३० विविध ठिकाणांना लक्ष्य करत भीषण हवाई हल्ले केले आहेत. या लष्करी कारवाईदरम्यान इराणमधील एका शाळेवर झालेल्या हल्ल्यात ५१ विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.तसेच ६०हून अधिक मुली जखमी झाल्या आहेत. इराणच्या सरकारी माध्यमांनी याला दुजोरा दिला असून, या घटनेमुळे जगभरात संतापाची लाट उसळली आहे. निष्पाप शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याने या संघर्षाला आता अधिक गंभीर स्वरूप प्राप्त झाले आहे.**

केल्याचं इस्राइलकडून सांगण्यात आलंय. दुसरीकडे इराणकडून होणाऱ्या प्रतिहल्ल्याची शक्यता लक्षात घेऊन इस्रायलमध्ये सायरन वाजू लागले आहेत. तसंच शाळा, महाविद्यालयं बंद करण्यात आली आहेत. शिवाय लोकांना **(पान ४ वर)**

## अजितदादांच्या अपघाताचे वैमानिकावर खापर!

### दृश्यमानता कमी असतानाही लँडिंगचा प्रयत्न भोवला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातासंदर्भात हवाई उड्डाण मंत्रालयाच्या एएआयबी तपास यंत्रणेचा २२ पानांचा प्राथमिक अहवाल समोर आला आहे. त्यामध्ये कमी दृश्यमानता, व्हीएफआर नियमांचे संभाव्य उल्लंघन आणि अनकंट्रोल्ड एअरफिल्डवरील सुरक्षा त्रुटी याकडे गंभीर बोट ठेवण्यात आले आहे. २८ जानेवारी रोजी झालेल्या या अपघातात अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला होता.

मुंबईहून बारामतीकडे निघालेल्या नॉन-शेड्युल्ड फ्लाइटने रनवे ११ वर लँडिंगचा प्रयत्न केला. पहिल्या प्रयत्नात 'गो अराउंड' करण्यात आला. दुसऱ्या प्रयत्नात पायलटने फिल्ड इन साईट कळवले. मात्र एटीसी ने ३ किमी दृश्यमानता नोंदवली, जी विजुअल फ्लाईट रुल अंतर्गत आवश्यक ५ किमीपेक्षा कमी होती. लँडिंग क्लिअरन्सनंतर काही क्षणांत विमान रनवेच्या डावीकडे सुमारे ५० मीटर अंतरावर झाडांवर आदळले आणि त्यानंतर आग लागून पूर्णतः नष्ट झाले असं या अहवालात म्हटलं आहे.




### प्राथमिक निष्कर्ष

- दृश्यमानता म्हणजेच व्हीएफआर मर्यादेपेक्षा कमी असूनही लँडिंगचा प्रयत्न.
- व्हीआयपी फ्लाइटसाठी अनकंट्रोल्ड एअरफिल्डवरील ऑपरेशन.
- हवामान आणि मूलभूत नेव्हिगेशन सहाय्यांमध्ये कमतरता.
- एअरफिल्ड सुविधांचे अपुरे मानक.
- बारामती येथे अधिकृत एमईटी सुविधा नाही.
- उपग्रह चित्रांनुसार परिसरात हलके धुके
- पुणे व मुंबईतही २०००-२५०० मीटर व्हीजिबिलिटी नोंदली गेली.
- रन वेवरील मार्किंग सहज दिसू शकतील असे नाही
- रन वेवर बारीक खडी आढळली
- रन वेला परिपूर्ण कुंपण नाही
- विमानतळावर अग्निशमन सुविधा नाही

## प्रेयसीची गोळ्या झाडून हत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चोपडा :** तालुक्यातील अकुलखेडा गावात प्रेमसंबंधातून दुहेरी मृत्यूची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रेयसीची बंदुकीने गोळ्या घालून हत्या केल्यानंतर प्रियकराने स्वतःवर गोळ्या झाडून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती पोलीस तपासातून पुढे आली आहे.



**प्रियकरानेही केली आत्महत्या**

जळगाव जिल्ह्यातील अकुलखेडा गावातील जगदीश पाटील हे आपली पत्नी अनिता हिच्यासह राहत होते. शनिवारी सकाळी सुमारे ११ वाजता त्यांची मुलगी शाळेतून घरी परतली असता घराचा दरवाजा बंद असल्याचे तिला दिसले. दरवाजा उघडून आत गेल्यावर आई अनिता आणि एक अन्य व्यक्ती रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसून आले.

मुलीने तात्काळ वडिलांना फोन करून घरी बोलावले. त्यांनी गंभीर प्रकार पाहताच पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले.

प्राथमिक तपासानुसार, अनिता आणि शिरपूर येथील देवानंद धनगर या तरुणाची काही दिवसांपूर्वी इंस्टाग्रामच्या माध्यमातून ओळख झाली होती. या ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले होते. दोघांमध्ये भेटीगाठी सुरू असल्याची **(पान ४ वर)**

## केजरीवालांची 'जंतरमंतर'वरून पुन्हा गर्जना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** दिल्लीचे जंतरमंतर पुन्हा एकदा एक प्रमुख राजकीय केंद्र बनण्याच्या तयारीत आहे. आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल रविवार, १ मार्च रोजी सकाळी ११ वाजता एका मोठ्या सभेला संबोधित करतील. ही सभा केवळ एक राजकीय कार्यक्रम नाही तर कोर्टाने केजरीवाल आणि मनीष सिसोदिया यांच्यासह सर्व २३ जणांची कथित उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात पूर्णपणे निर्दोष मुक्तता करण्याच्या निर्णयानंतरचा पहिला मोठा सार्वजनिक कार्यक्रम आहे. न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की कोणताही व्यापक कट रचला गेला नव्हता, कोणताही गुन्हेगारी हेतू नव्हता आणि कोणताही प्रथमदर्शनी खटला नव्हता. शिवाय, तपासाचे वर्णन पूर्वनियोजित आणि कट रचलेला असेही करण्यात आले. या निर्णयानंतर, आम आदमी पक्ष आणि त्यांच्या समर्थकांमध्ये एक नवीन ऊर्जा दिसून येते. पक्ष याला सत्य आणि प्रामाणिकपणाचा विजय म्हणत आहे.



**आज सकाळी ११ वाजता सभेला संबोधित करणार**

न्यायालयातून बाहेर पडताना अरविंद केजरीवाल भावनिकपणे घोषित करतात, मी कट्टर प्रामाणिक आहे. मी आयुष्यात फक्त प्रामाणिकपणा मिळवला आहे. **(पान ४ वर)**

# कर्जमाफी आदेशाचे उल्लंघन

## राज्य सरकारला उच्च न्यायालयाची 'नोटीस'

### छत्रपती शिवाजी महाराज कर्जमुक्ती योजना २०१७ : १२ मार्चपर्यंत उत्तर देण्याचे आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत पात्र असूनही लाभापासून वंचित असलेल्या राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या प्रश्नी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकारला कडक शब्दांत फटकारले आहे. न्यायालयाच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे दाखल करण्यात आलेल्या अवमान याचिकेवर सुनावणी घेताना, खंडपीठाने राज्य सरकारसह संबंधित उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना नोटीस बजावत १२ मार्च २०२६ पर्यंत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

#### पात्र शेतकरी वंचित: राज्यातील अजूनही ६.५६ लाख शेतकरी कर्जमाफीच्या प्रतीक्षेत

- **थकीत रक्कम : सुमारे ५,९८५ कोटी रुपयांचा लाभ शेतकऱ्यांना मिळणे अद्याप बाकी.**
- **न्यायालयीन आदेश: १५ ऑक्टोबर २०२५ च्या आदेशानुसार ६ आठवड्यांत निधी देण्याचे निर्देश होते.**
- **पुढील सुनावणी: राज्य सरकारला १२ मार्च २०२६ पर्यंत स्पष्टीकरण देण्याचे खंडपीठाचे आदेश.**
- **आरोप : सरकारने केवळ १५० कोटी रुपये देऊन न्यायालयाची दिशाभूल केल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा.**



श्रीरामपूर तालुक्यातील खिर्डी येथील शेतकरी भाऊसाहेब बजरंग पारखे यांनी कर्जमाफी मिळावी यासाठी रिट याचिका दाखल केली होती. यावर निकाल देताना न्यायालयाने केवळ पारखे यांनाच नव्हे, तर राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांना दीड लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याचे आदेश दिले होते. मात्र, या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने पुन्हा अवमान याचिका दाखल करण्यात आली. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी न्यायालयाने सरकारला ६ आठवड्यांत **(पान ४ वर)**

## जेवणाच्या वादातून रचला मृत्यूचा कट..!

### मित्राने मित्राचा काटा काढला; गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर तालुक्यातील तांदळी-वडगाव परिसरात घडलेल्या तरुणाच्या मृत्यू प्रकरणात मोठा आणि खळबळ उडवणारा उलगडा झाला आहे. संदीप ताराचंद लगड (वय ३२) याचा मृत्यू अपघात नसून ती नियोजनबद्ध हत्या असल्याचं पोलीस तपासात निष्पन्न झालं आहे. या प्रकरणी आरोपी ऋषिकेश बाळासाहेब घिगे व राजेंद्र रमेश घोंगडे या दोघांवर आधी दाखल असलेल्या सदोष मनुष्यवधाच्या गुन्ह्यात हत्येचे वाढीव कलम लावण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संदीप लगड, ऋषिकेश घिगे आणि राजेंद्र घोंगडे हे एकमेकांचे जवळचे मित्र होते. १९ जानेवारीच्या रात्री ते तिघे वाळकी शिवारातील हॉटेल जंगली येथे जेवणासाठी गेले होते. यावेळी त्यांच्यात जोरदार वाद झाला. या वादाचा राग मनात ठेवून आरोपींनी संदीपला संपवण्याचा कट रचल्याचा पोलिसांचा संशय आहे. जेवण करून घरी परतताना पियुष साखर कारखान्याजवळ संदीप मोटारसायकलवर जात असताना आरोपींनी पिकअप वाहनाने पाठीमागून जोरदार धडक



दिली. धडकेत संदीप गंभीर जखमी झाला. मात्र, त्याला तातडीने रुग्णालयात नेण्याऐवजी आरोपींनी घटनास्थळ सोडून पळ काढला.

जखमीला मदत न करता पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला गेला. संदीपच्या डोक्याला गंभीर मार लागून तो रक्तबंबाळ अवस्थेत पडलेला असतानाही आरोपींनी मदत केली नाही. उलट काही वेळानंतर परत येऊन बनावट नाट्य करत इतरांना बोलावले आणि त्याला दवाखान्यात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपींनी वाहन लपवून अपघाताचा बनाव केला. त्यामुळे सुरुवातीला हा अपघात असल्याचं चित्र निर्माण झालं.

**भावाची तक्रार; पोलिसांचा तपास आणि धक्कादायक सत्य**

मयताचा भाऊ रामदास लगड यांनी हा अपघात नसून हत्या असल्याची तक्रार करत सखोल चौकशीची मागणी केली. त्यानंतर पोलीस अधिक्षकांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखा आणि स.पो.नि. गणेश वारुळे यांनी तांत्रिक विश्लेषण, पुरावे आणि चौकशीच्या आधारे सत्य बाहेर आणले. तपासात दोघांनी मुद्दाम धडक देऊन संदीपची हत्या केल्याचं स्पष्ट झालं. त्यामुळे या गुन्ह्यात बीएनएस कलम १०३ (१) अंतर्गत हत्येचे वाढीव कलम लावण्यात आले आहे. **(पान ४ वर)**



## संपादकीय

# पारदर्शकता आणि सर्वसमावेशक अंमलबजावणी हवी

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था उंच भरारी घेत असल्याचे चित्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत गुरुवारी मांडले. २०१२-१३ मध्ये ही अर्थव्यवस्था १३ लाख कोटी रुपये इतकी होती. गेल्या ११ वर्षांत ती तिपटीने वाढून आज ५१ लाख कोटी रुपयांवर पोहोचली असून, २०२९-३० मध्ये ९० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. इतिहासात राज्यासाठी कोणी किती योगदान दिले, यावर बरेचदा आरोप-प्रत्यारोप होत असतात. आताच्याच सरकारने सगळे केले असल्याचा दावा करीत असेल तर आधीच्यांनी काहीही केले नाही काय, अशी संतप्त विचारणा विरोधकांकडून केली जाते आणि ती साहजिक आहे. पूर्वाश्रमीच्या नेत्यांनी राज्याच्या विकासासाठी दिलेल्या अपूर्व योगदानाचा सन्मान करताना फडणवीस यांनी राज्याला दिलेल्या विकासाच्या नव्या दृष्टीचेही कौतुक करणे हेच संतुलित मतप्रदर्शन ठरेल. मुळात देशाची अर्थव्यवस्था साडेचारशे लाख कोटी रुपयांची करण्याचे उद्दिष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बाळगले आहे. त्याला पूरक अशी भूमिका विविध राज्ये सध्या घेत आहेत आणि त्यात नावाप्रमाणे 'महा' राष्ट्र अग्रेसर आहे.

केंद्र सरकारने नंतर देशात लागू केलेल्या अनेक योजना अशा आहेत की ज्यांची अंमलबजावणी आधी महाराष्ट्राच्या सरकारने केली होती. त्यामुळे देशाच्या विकासाचा रथ पुढे जात असताना या रथाचे दमदार घोडे महाराष्ट्राचे असणे अत्यंत स्वाभाविक आहे. देशाच्या जीडीपीमध्ये सुमारे १४ टक्क्यांच्या आसपास हिस्सा, जीएसटी संकलनात आघाडी, थेट परकीय गुंतवणुकीत सुमारे ३९ टक्के वाटा-ही आकडेवारी राज्याची आर्थिक ताकद अधोरेखित करते. मात्र, केवळ आकडे सांगून विकास साध्य होत नाही; त्यामागील दिशा, अंमलबजावणी आणि सर्वसमावेशकता तितकीच महत्त्वाची आहे. फडणवीस यांनी तीच मांडली आहे.

राज्याच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले धोरणात्मक सातत्य, पारदर्शकता आणि कार्यक्षम अंमलबजावणी यांची खात्री देऊन होणार नाही तर हे सगळे अंमलातही आणावे लागणार आहे. त्यासाठीची आश्वासक आणि दमदार सुरुवातही त्यांनी केली आहे.

अलीकडे दावोसमधील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रासाठी ३० लाख कोटी रुपये गुंतवणुकीचे करार झाले आहेत. असे करार आणि प्रत्यक्ष गुंतवणूक यात फरक असतो. करारांची टक्केवारी जरी ७०-८० टक्क्यांपर्यंत अंमलबजावणीत असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्ष प्रकल्प पूर्णत्वास कधी आणि कितपत पोहोचतात, स्थानिकांना किती रोजगार मिळतो, आणि पर्यावरणीय परिणाम काय असतात, याचे सुस्पष्ट उत्तर देणे आवश्यक आहे.

फडणवीस सरकारने वेळोवेळी त्याबाबतची माहिती सार्वजनिक केली तर गुंतवणुकीबाबत लोकांमध्ये विश्वास निर्माण होईल. डेटा सेंटर, स्टील, पायाभूत सुविधा अशा क्षेत्रांत मोठ्या गुंतवणुकीची घोषणा झाली आहे. पण या गुंतवणुकीचा भौगोलिक समतोल राखला गेला पाहिजे. विकास मुंबई-पुणे-नाशिक पट्ट्यापुरता मर्यादित न राहता विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या भागांनाही लाभ झाला पाहिजे.

अजिबात उद्योग नसलेल्या जिल्ह्यांमध्ये एक मेगाप्रकल्प आणून हा समतोल फडणवीस यांनी साधावा, अशी अपेक्षा आहे. गडचिरोलीचे पालकत्व त्यांनी स्वतःच घेतले असून, सर्वात मागासलेला हा जिल्हा आता प्रगतीच्या वाटेवर निघाला आहे. अशीच अवस्था बुलढाण्यापासून वाशिम, परभणी, धाराशिवपर्यंत आहे. आपण विकसित होत आहोत, ही भावना राज्यभर असणे महत्त्वाचे आहे.

स्टार्टअप संस्कृती केवळ मुंबई-पुण्यापुरती न राहता छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर, नाशिक अशा शहरांमध्येही विस्तारली पाहिजे. ग्रामीण भागातील तरुणांनाही या नव्या अर्थव्यवस्थेत स्थान मिळाले पाहिजे. गुणवत्तापूर्ण, दीर्घकालीन आणि कौशल्याधारित रोजगारनिर्मितीवर भर देणे गरजेचे आहे. खासगी क्षेत्रातील नोकऱ्यांची स्थिरता, वेतनमान आणि सामाजिक सुरक्षा यांवरही तितकेच लक्ष दिले पाहिजे.

सामाजिक प्रगती आणि सामाजिक स्वास्थ्य ही विकासाच्या व्याख्येतील प्रमुख मानके असली पाहिजेत. त्यासाठी राजकीय स्थैर्य, वित्तीय शिस्त, उद्योगस्नेही वातावरण, कौशल्यविकास, शेतीसुधारणा आणि सामाजिक समावेशकता या सर्व घटकांची सांगड घालावी लागेल.

विकास केवळ आकड्यांचा खेळ नसतो; तो सामान्य नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणतो तेव्हाच त्याला अर्थ प्राप्त होतो. महाराष्ट्राकडे क्षमता आहे, संसाधने आहेत आणि दिशा निश्चित करण्याची इच्छाशक्तीही दिसते. आता खरी परीक्षा आहे ती सातत्यपूर्ण, पारदर्शक आणि सर्वसमावेशक अंमलबजावणीची.

# मारहाण करणाऱ्या आरोपींवर कडक कारवाई करा

## निराधार महिलेचे उपोषण



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील रामडोह येथील गावातील काही गुंडानी निराधार महिलेच्या घराचे गेट तोडून तीला व तीच्या आई - वडील आणि मुलीला जब्बर मारहाण करून या महिलेची छेडछाड करून तीचा विनयभंग केल्याप्रकारणी या गुन्ह्यातील संबंधित आरोपींवर वाढीव कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीसाठी मनीषा लकारे ही महिला तीच्या वृद्ध आई आणि मुलीला बरोबर घेवून शनिवार (दि.२८) रोजी सकाळी १० वाजेपासून नेवासा पोलीस ठाण्यासमोर आपल्या न्यायहक्कासाठी अमरण उपोषणास बसली आहे.

याबाबत अधिक सविस्तर वृत्त असे की रामडोह येथील मनीषा लकारे या महिलेला गावातील काही गुंड प्रवृत्तीच्या महिला - पुरुष मंडळींनी तीच्या घराचे गेट तोडून तीला व तीच्या वृद्ध आई - वडील तसेच लहान मुलीला बेदम मारहाण करून तीचा विनयभंग केला तसेच या मारहाणीत ती आणि तिची मुलगी गंभीर जखमी झाल्यामुळे इयत्ता दहावीत शिक्षण घेणाऱ्या तीच्या मुलीची बोर्ड परीक्षा बुडालेली असून संबंधित आरोपींवर नेवासे पोलीस ठाण्यात वाढीव कलमांन्यवे गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी मनीषा लकारे ही महिला आपल्या आई आणि लेकीला सोबत घेवून शनिवारी सकाळी पोलीस ठाण्यासमोर उपोषणास बसली आहे.

या महिलेने संबंधित आरोपीवर नेवासे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर पुन्हा गावातील काही गुंडानी या महिलेला ''तु आमच्या विरुद्ध फिर्याद का दाखल केली'' असे म्हणून या फिर्यादीतील आरोपीने आणि गावातील काही महिलांना बरोबर घेवून हातात काठ्या,कोयते घेवून फिर्यादी महिलेच्या घरात घुसून मारहाण,विनयभंग आणि घरातील काही पैसे आणि सोने चोरी केल्यामुळे या गुन्ह्यातील आरोपींवर वाढीव कलमान्यवये गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी ही महिला अमरण उपोषणास बसली आहे.

# धनवानापेक्षा ज्ञानवान व्यक्तीला जगात मान सन्मान : भागवताचार्य कोरडे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर :** सनातन धर्माच्या अठरा पुराणांमध्ये भागवत सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. जीवनात भक्ती ज्ञान वैराग्य प्राप्त करून देणारा हा ग्रंथ धनवानापेक्षा ज्ञानवान व्यक्तीला जगात मान सन्मान मिळतो असे उद्गार भागवताचार्य संगीताताई कोरडे यांनी काढले.जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज सेवा ट्रस्ट व ग्रामस्थ लोणी बुद्रुक यांच्या वतीने आयोजित संत तुकाराम बीज उत्सवानिमित्त लोणी बुद्रुक येथे आयोजित श्रीमद् भागवत कथा व संत एकनाथ गाथा पारायण सोहळ्यात कथेच्या प्रारंभी सौ. कोरडे बोलत होत्या.यावेळी लोणी भूषण भारत महाराज धावणे उपस्थित होते.

श्रीमद् भागवत कथेच्या पहिल्या दिवशी भागवत महात्म्य सांगताना त्या म्हणाल्या की, हा फक्त ग्रंथ नाही तर भगवान श्रीकृष्णाच्या मुखात बाहेर पडलेले श्लोक रुपी शब्द आहेत. भक्ती, ज्ञान, वैराग्य यांची जाणीव करून देताना थेट मोक्ष प्राप्ती भागवत कथा श्रवणातून होते.देवावर निष्काम प्रेम करण्याचा मार्ग या ग्रंथाने दाखवला आहे. परिवर्तनासाठी हा ग्रंथ आहे. हा ग्रंथ व्यासांपर्यंत चतुःश्लोकी होता.व्यास,शुकाचार्य, राजा परीक्षिती असा त्याचा प्रवास आहे. प्रत्येकाचे जीवनाचे ध्येय मोक्ष असले पाहिजे व ते गाठण्यासाठी भागवत कथेचे श्रवण हा सहज,सोपा मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज मंदिर सभागृहात शुक्रवारी सकाळी हभप भारत महाराज धावणे यांच्या नेतृत्वाखाली शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज गाथा पारायणास उत्साहात आरंभ झाला. मोठ्या संख्येने वाचकांनी यामध्ये सहभाग नोंदवला.सकाळी पारायण,सायंकाळी हरिपाठ आणि रात्री ८ ते १० भागवत कथा अशी दिनचर्या असल्याने लोणी परिसरातील भाविक मोठ्या संख्येने या नाम यज्ञ सोहळ्यात सहभागी होऊन दर्शन, श्रवण आणि संत सेवेचा आनंद घेत आहेत.

## आज ना. आठवले जिल्हा दौऱ्यावर श्रीरामपूरात डॉ आंबेडकर पुतळ्याचे भूमिपूजन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी. :** केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री ना . रामदास आठवले हे अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचे प्रमुख उपस्थितीत सामाजिक न्याय विभागाची बैठक पार पडणार आहे. सकाळी नऊ वाजता ते मुंबईवरून शिर्डी कडे येतील, दुपारी एक वाजता केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची जिल्हास्तरावर अंमलबजावणी, प्रलंबित प्रकरणे, लाभार्थ्यांची स्थिती आणि निधी वितरणाचा आढावा घेणे , अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक व वंचित घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृह शिर्डी येथे बैठक पार पडणार आहे. त्यानंतर पावणेचार वाजता शासकीय विश्रामगृहावर पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर पाच वाजता श्रीरामपूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे भूमिपूजन कार्यक्रमास उपस्थित राहतील. त्यांचे समवेत पालकमंत्री ना राधाकृष्ण विखे हे ही उपस्थित राहणार आहेत.

## लोणीच्या फार्मसीला केंद्राकडून संशोधनासाठी अनुदान

### प्रवरेची ग्रामीण भूमीतून राष्ट्रीय स्तरावर झेप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीला भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालय, भारत सरकारची भारतीय ज्ञान प्रणाली - संस्थात्मक इंटर्नशिप कार्यक्रम अंतर्गत महाविद्यालयाला तब्बल १३ लाख ६० हजार रुपयांचे संशोधन अनुदान मंजूर झाले आहे. अशी माहीती प्राचार्य डॉ.रविंद्र जाधव यांनी दिली.

या योजनेअंतर्गत देशभरातील एकूण ६४ प्रकल्पांची निवड झाली असून औषधनिर्माण शास्त्र क्षेत्रातील देशातील केवळ दोनच फार्मसी महाविद्यालयांना अनुदान प्राप्त झाले आहे. त्यामध्ये इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोणीचा समावेश आहे ही बाब संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.

हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प भारतीय पारंपरिक आहारपद्धतीतील घटकांचा वैज्ञानिक समन्वय, त्यांच्या परस्परपूरक गुणधर्मांचा अभ्यास आणि त्यांचे आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम यांचा सखोल शोध घेणार आहे.भारतीय ज्ञानपरंपरेला आधुनिक विज्ञानाची जोड देणारा हा अभ्यास आरोग्य क्षेत्रासाठी अत्यंत मोलाचा आणि दिशादर्शक ठरणार आहे. प्रमुख संशोधक डॉ. गणेश एस. शिंदे सहसंशोधक प्राचार्य डॉ. आर. एस. जाधव त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली हे संशोधन राष्ट्रीय स्तरावर आदर्श निर्माण करेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील म्हणाल्या, हे यश संस्थेतील उत्कृष्ट शैक्षणिक गुणवत्ता, संशोधनाभिमुख वातावरण आणि आधुनिक सुविधांचे प्रतीक आहे.या यशामुळे प्रवरा संस्थेचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल झाले असून ग्रामीण उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्राला नवी प्रेरणा, नवी दिशा आणि नवा आत्मविश्वास मिळाला आहे.

## गुरु तेग बहादूर यांचे मानवता व धर्मरक्षण कार्य प्रेरणादायी : संजय लाखवाल



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा :** महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभागामार्फत आयोजित 'हिंद दी चादर' या कार्यक्रमांतर्गत गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त नेवासा तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जेऊर हैबती येथे उत्साहात कार्यक्रम पार पडला. प्रमुख उपस्थिती नेवासा तालुक्याचे गटविकास अधिकारी संजयजी लाखवाल यांची होती.

शासनाच्या निर्देशानुसार शाळा व महाविद्यालयांमध्ये परिपाठावेळी सतिंदर सरताज यांच्या 'हिंद दी चादर' या जीवनपटावर आधारित भक्तीगीतांचे समूहगान करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना लाखवाल यांनी गुरु तेग बहादूर यांचे मानवता व धर्मरक्षणासाठीचे बलिदान प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच महेश म्हस्के होते. दानशूर रघुनाथ मस्के यांनी दिलेल्या ८१ हजार रुपयांच्या देणगीतून उभारण्यात येणाऱ्या शालेय स्टेजचे भूमिपूजन लाखवाल यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन रविंद्र डौले यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक कैलास निकम यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता समूहगानाने झाली.

## सहकार वाचविण्यासाठी साखर दरवाढ अत्यावश्यक : बिपीन कोल्हे



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** बदलत्या मुक्त अर्थव्यवस्थेत वाढत्या स्पर्धेमुळे सहकार क्षेत्रासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. साखर उद्योग टिकवायचा असेल तर केंद्र व राज्य शासनाने एफआरपी जाहीर करण्यापूर्वी साखर विक्रीदर, इथेनॉल व सहवीज खरेदीदरात तातडीने वाढ करावी, असे प्रतिपादन बिपीन कोल्हे यांनी केले.

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना यांच्या ६३ व्या गळीत हंगामाच्या सांगता समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी संचालक निलेश देवकर, सोनलताई देवकर आदी उपस्थित होते.

कोल्हे म्हणाले, सहकार क्षेत्रावर खाजगी उद्योगांचे आव्हान वाढत असून ग्रामीण अर्थकारण व उस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी ठोस धोरणांची गरज आहे. कारखान्याने सहवीज निर्मिती, ज्यूसपासून इथेनॉल, बायोगॅस, बायो-सीएनजी, हायड्रोजन ऊर्जा व इतर उपपदार्थ निर्मितीचे पायलट प्रकल्प राबवून आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारला आहे. आगामी दशकातील आव्हानांचा सामना करण्यासाठी संजीवनी समूह सज्ज असल्याचे त्यांनी नमूद केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी साखर उद्योगावरील सुमारे १० हजार कोटींचा आयकर माफ करून दिलासा दिल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शासकीय काट्यांच्या निर्णयाचे स्वागत केले.

साखर उद्योग सहा महिने चालला तरच त्यावर अवलंबून घटक टिकतील, अन्यथा कापड उद्योगाप्रमाणे परिस्थिती निर्माण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. कार्यक्रमास संचालक, उस उत्पादक सभासद, वाहतूकदार व विविध संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्जमुक्ती योजनेत पतसंस्था व व्यापारी सहकारी बँकांचा समावेश करावा : औताडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** राज्य शासनाने ३० जून २०२६ पूर्वी संपूर्ण कर्जमुक्ती योजना राबविण्याचा निर्णय घेतला असला तरी सातबारा उताऱ्यावरील पतसंस्था व व्यापारी सहकारी बँकांचा त्यात समावेश नसल्याने शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. या योजनेत कोणताही भेदभाव न करता संबंधित वित्तीय संस्थांचाही समावेश करावा, अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे यांनी केली आहे.

या मागणीसाठी शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले. शिष्टमंडळात युवराज जगताप, साहेबराव चोरमल, सुदामराव औताडे आदींचा समावेश होता.निवेदनात म्हटले आहे की, पतसंस्था व व्यापारी सहकारी बँकांना शेतीसाठी किमान पाच टक्के वित्तपुरवठा बंधनकारक असतानाही कर्जमुक्ती योजनांमध्ये त्यांना वगळण्यात आले आहे. संबंधित संस्थांकडून घेतलेली कर्जे सातबारा उताऱ्यावर नोंद असून त्यावरील व्याजदरही जास्त आहेत. अनेक बँकांकडून एकरकमी परतफेड योजना प्रभावीपणे राबविली जात नाही.

# धरणात उडी घेऊन तरुणाची आत्महत्या


रोहित विलास काटे


**वैजापूर :** शहरातील धरणग्रस्त नगर भागात राहणाऱ्या २७ वर्षीय तरुण रोहित विलास काटे हा येथील नारंगी धरणाच्या पाण्यात मृतावस्थेत आढळून आला. शनिवारी सकाळी साडे दहा वाजेला ही घटना उघडकीस आली. रोहित याने धरणात उडी घेऊन आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त होत आहे. मात्र त्याच्या आत्महत्येचे नेमके कारण कळू शकले नाही. रोहित हा अविवाहित होता. सकाळी साडे दहा वाजेपूर्वी त्याने नारंगी धरणात उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवली असा कयास आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. येथील उप जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. याप्रकरणी वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीवरून वैजापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आलीआहे. अधिक तपास पोलीस उप निरीक्षक रामचंद्र जाधव हे करीत आहेत.

# ट्रकच्या चाकाखाली सापडून दोन तरुणांचा मृत्यू



**शेवगाव :** शहरातील शेवगाव-मिरी रोडवर शनिवारी दुपारच्या सुमारास झालेल्या अपघातात दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ट्रकच्या मागील चाकाखाली सापडून अपघात घडला. या दुर्घटनेत विनोद पांडुरंग शिंदे (वय १८) व निखिल उर्फ पांडू सोमनाथ पठाडे (वय २० ) या दोन तरुणांचा मृत्यू झाला आहे. दोन्ही मृत तरुण हे शेवगाव तालुक्यातील वरुर येथील रहिवासी होते. सायंकाळी शेवगाव ग्रामीण रुग्णालय येथे शवविच्छेदन करण्यात येऊन त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात मृतदेह देण्यात आले.घटनेची बातमी समजताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या दुर्दैवी घटनेमुळे दोन्ही कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.दरम्यान, अपघात प्रकरणी सायंकाळी उशिरापर्यंत शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद झालेली नव्हती.

# 'जशी तुमचे कर्म कृत्य, तसेच तुम्हाला फळ दिलं जाईल' दिव्य कुरआन.




प्रेषित मुहम्मद स्व. नी कथन , '' रमजान महिण्यात तीन विविध विभाग त्यालाच आशराहा म्हटलं जातं , ज्यामध्ये पहिला (१) '' रहमत ''(२) दुसरा '' मगफिरात ''आणि (३)तिसरा विभाग हा '' जहाँनम से आझादी ( नरकात भडकत्या आगीत सुरक्षता ).

रमजान मुबारक चे ११ रोजे पूर्णतःवास जात आहेत, गाफिल व निष्काळजी आहोत, खुशाल संधीची वाट लावत आहोत, पहिले दहा रोज़े हें ''रहमत '' अर्थातच ''दया '' करणारा, अल्लाह हें दया करणारे आहेत, आपल्या दिवस भरात किती न कळत अशा गोष्टी होत असतात ज्याचं अपल्याला गुमान ही नसतं. उदाहरण पुष्कळ देता येतील चालता चालता कोणाला तरी न कळत शिवी , व्यवहार करताना खोटे शपथ खाऊन माल विकतात किंवा घेतात अर्थातच कोणाला तरी फसवूनच व्यवहार चालतात, भाजीवाला वारंवार भाजीवर ताजी दिसावी म्हणून पाणी मारून ताजी आहेत म्हणून विकतात, पैसे डुबवलं जातात, खोटे बोलून घरी बसले जाते, देणं घेणं खोटे बोलून टाळलं जातं, असंख्य गोष्टी कळत न कळत केलं जातं, वारंवार खोटे बोललं जातंय,दोस्ता, वडिल, आपल्या बॉस बरोबर, असं असंख्य उदाहरण देता येथील, मनात रुख -रुख असतं, रमजान मध्ये वारंवार अल्लाह( ईश्वरा,- भगवंत,) कृपा -दया - रहमत राहावीत- हवी यासाठीच अल्लाह शी वारंवार माफी मागितली पाहिजे, तसेच वारंवार जाणीवपूर्वक व नकळत होणाऱ्या चुका पुन्हा कधी होणार नाहीं याची अल्लाह शी गवाही,- साक्ष दिली पाहिजेत. अल्लाह हा दायवंत,- कृपावंत- कृपाळू ही आहेत. अल्लाह ( परमेश्वर )आपल्या बंद्यावर आई सारखं चं सत्तर आई पेक्षा जास्त प्रेम करत असतो. वारंवार माफी मागत चला, ज्याच्याशी तुम्हीं चुकीनें वागलात, बोललात, चुकीचे व्यवहार केलेत त्या सर्वांशी पुन्हा - वारंवार माफी मागा अल्लाह एवढा दयावान आहेत तर आपल्या समोरील व्यापारी, आई, बाबा, मित्र,नातेवाईक,ज्यांच्या -ज्यांच्या बरोबर चुकीचं वक्तव्य केलं तो तर मनुष्य आहेत.. चुका या माणसा कडूनच होतं असतात. जगात फक्त्त चुका फारिस्ते करीत नसतात, मनुष्य प्राणी हा वारंवार चुका करणारा आहेत म्हणून राहमत साठी दुवा प्रार्थना करा. रामजानुल मुबारक चा या पवित्र महिना अल्लाह चा आवडता महिना आहेत, जास्तीच जास्त चुका माफ होण्याचा संधीचा पवित्र महिना आहेत.


प्रेषित मुहम्मद स्व. सांगतात, '' रमजान महिन्यात काही गोष्टी वारंवार कराव्यात, (१) वारंवार अल्लाह ( परमेश्वर ) एक आहेत व प्रेषित मुहम्मद स्व, अल्लाह चे अंतिम प्रेषित- पैगंबर, संदेशष्टा (संदेश वाहक )आहेत. अर्थातच ला ई लहा ईललिल्लाह मुहम्मद दूर रसूललिल्लाह स्व. अल्लाह ( ईश्वर- भगवंत ) चे नामस्मरण - चिंतन जेवढे शक्य आहेत तेवढं करणं. (२) इस्तीगफार (आपण केलेल्या भूतकाळातील चुकांची माफी वारंवार मांगने ), (३)जन्नत तुल फिरदोस ची इच्छा व्यक्त करणं ( परलौकिक जीवनानंतर स्वर्गातील चांगल्या जागेची इच्छा ). (४) दोजख कें आग से पन्हा ( मारणोत्तर परलौकिक जीवनात नरकातील अगी पासून स्वरक्षण ).

बहुतेक बंधूना उपासना मागचा उद्देशच माहित नससो. बंधू भगिनी आजूबाजूला, शेजारी करतात म्हणून करीत असतात, उपवास रोजा चे काहीतरी उद्देश हा असतो. कोणत्याही गोष्टी या काहीतरी उद्देशानेच ठरवून त्या अभिप्रेत असतात. त्या समजूनच केल्या पाहिजेत. असो.

रोजे ठेवण्याचा उद्देश विचारलं तर,फारच थोडया लोकांना व्यवस्थित उत्तर देता यईल म्हणून सर्व रोजदारांनी आपलं उदीष्ट काय आहेत हें माहित करून उपासना केली तर किती योग्य राहील, अल्लाह राजी होईल होतील.. म्हणून या, ''रहमत'' तर गेला आता पुढील ११-२० दिवस हें मगफिरत म्हणजे अल्लाह ( परमेश्वर ) रा कडून माफी मागून माफी मिळवून घेण्याचे आहेत. उद्या पासून '' मगफिरात '' चा अशरहा ( विभाग ) चालू होणार आपण केलेल्या चुकांची माफी मागायची...

दिव्य कुर आन मध्ये अल्लाह स्पष्ट सांगतात, '''' तुम्हीं सहनशिलता दाखवा किंवा दाखवू नका त्याने काहीही होणार नाहीं, तुम्हाला तसाच मोबदला दिला जाईल, जशी तुम्हीं कृत्य करीत होता '' सुरहा नं ५२,अत- तुर आ. नं. १६ ).


दिव्य कुरआन मध्ये अल्लाह सांगतात, '' पण (इशभीरू) अल्लाह ची जाण ठेवून जीवन जगलेले इसम त्या दिवशी ऐश्वरय संपन्न अशा महालात असतील. ' सुरहा ५२ अत -तुर आ नं. १७.). समस्त जगातील शांती - बंधुता व एकता टिकावं म्हणून आपल्या दुवा मध्ये सामील करा. निच्छितच जगातील शांती एकता जगासाठी फार महत्वाची आहेत..


डॉ. सलीम शेख
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### इब्राहिमखान रमजानचा रोजा पूर्ण



**सोनई** : येथील निवासी अन्सर सय्यद व हाजी आसिफ खान यांचे नातू व संगमनेर येथील प्रसिद्ध असलेले इब्राहिमखान जम जम पानयांचे ते चिरंजीव इब्राहिमखान बशारातखान पठाण ( वय ५) याने पवित्र रमजान महिन्यातील कडक रोजा पूर्ण केल्याने त्याचे सोनई, संगमनेर, परिसरातून कौतुक केले जात आहे. एवढ्या लहान वयात रोजा पाळत त्याने श्रद्धा, संयम, व चिकाटीचा संदेश समाजाला घालून दिला. रमजान महिन्यात मुस्लिम समाज पहाटेपासून ते सूर्यास्त पर्यंत उपवास पाळला जातो या काळात प्रार्थना, आत्मचिंतन, आणि संयमाला विशेष महत्त्व दिले जाते. इब्राहीम खानने पूर्ण दिवस उपवास पाळून धार्मिक कर्तव्य पार पाडले. त्याच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक तसेच परिसरातील नागरिकाकडून अभिनंदन केले जात आहे.

### पुणतांबा-श्रीरामपूर मार्गावरील गतिरोधकांमुळे प्रवाशांची डोकेदुखी

**पुणतांबा** : पुणतांबा-श्रीरामपूर या सुमारे १९ किलोमीटरच्या मार्गावर ठिकठिकाणी उभारण्यात आलेली गतिरोधके प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत असल्याची तक्रार पुढे आली आहे. ही अनियमित गतिरोधके तातडीने काढली नाहीत तर मनसेच्या वतीने धडक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा तालुका अध्यक्ष श्रीगणेश जाधव यांनी दिला आहे. पुणतांब्यापासून श्रीरामपूर स्टँडपर्यंत तब्बल १७ गतिरोधके असून काही ठिकाणी वस्ती व घरांसमोर सोयीने ती उभारण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक गतिरोधकांवर पांढरे पट्टे किंवा सूचना फलक नसल्याने वाहनचालकांना अचानक ब्रेक मारावे लागतात. विशेषतः गोंधवणी व बना परिसरातील गतिरोधके प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने नियमानुसार आवश्यक तीच गतिरोधके ठेवून उर्वरित तातडीने हटवावीत, अशी मागणी जाधव यांनी केली आहे.

### गोदावरी कालव्याचे सुरू असलेल्या आवर्तनातूनच पिकांना पाणी मिळावे

**गोंडेगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील गोंडेगाव परिसरात सध्या गोदावरी कालव्याद्वारे पिण्याचे व रब्बी असे आवर्तन सुरू आहे परंतु उन्हाची तीव्रता वाढू लागल्यामुळे शेतकऱ्यांना पाणीटंचाई जाणू लागली आहे. यामुळे ऊस कांदा मका भुईमूग बाजरी व चारा पिके यांना पाण्याची अत्यंत गरज आहे धरणात भरपूर पाणीसाठा असल्यामुळे याच आवर्तनातून पिकांना पाणी देण्याचे नियोजन करून सात नंबर पाणी मागणी अर्ज भरून घेऊन पाणी देण्यात यावी अशी मागणी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष विलास कदम यांनी केली आहे. यंदा कालवा समिती बैठक कार्यक्षेत्रात न झाल्याने पाटपाण्याचे नियोजन शेतकऱ्यांना अजूनही समजले नाही व शेत शिवारातील पिकांची परिस्थिती व गरज अधिकाऱ्यांना माहित नाही ही बाब लक्षात आणून देण्यासाठी राज्याचे जलसंपदा व जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांची शिष्टमंडळासह लवकरच भेट घेणार असल्याचे कदम यांनी स्पष्ट केले.

### सुजाता इंटरनॅशनल स्कूलमध्ये विज्ञान दिन साजरा



**सोनई** : येथील सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये २८ फेब्रुवारी हा विज्ञान नोबेल पारितोषिक विजेते सी. व्ही. रमण यांच्या जयंती निमित्ताने मोठ्या उत्साहात विज्ञान दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका ज्योती सोनवणे ह्या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून विज्ञान विषयांचे शिक्षिका सुरेखा कर्जुले ह्या होत्या. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञानाच्या उज्ज्वल भविष्य विषयीशिक्षक आहेर, व कर्जुले म्याडम यांच्यासाह अनेकांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी अनेक प्रोजेक्ट प्रदर्शन मंडण्यात आले होते. संशोधनात संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन प्रतीक्षा मोकाटे यांनी केले व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले .


### मराठीचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जपा : डॉ. संदिप तांबे

**सोनई** : मुळा एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहत साजरा करण्यात आला. प्रारंभी संत ज्ञानेश्वरांच्या आणि कुसुमाग्रज यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. अध्यक्षस्थानी डॉ. मच्छिंद्र वर्पे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषि महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ.संदिप तांबे होते. मार्गदर्शन करताना डॉ.संदिप तांबे यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेचा अभिमान बाळगुन दैनंदिन व्यवहारात तिचा वापर वाढवावा.मराठी बोलण्याची भाषा नसून ती संस्काराची भाषा आहे.नवीन पिढीमध्ये मराठी भाषेविषयी प्रेम निर्माण होणे,.तिचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा प्रत्येकाने जपावा असे आवाहन तांबे यावेळी केले. डॉ.संजय शिंदे आणि डॉ.अविनाश साळवे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.आपल्या दैनंदिन बोलण्यात सर्वांनी मराठीचा वापर करावा असे डॉ.मच्छिंद्र वर्पे म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.राहुल निपुंगे तर आभार प्रा.निवृत्ती सोनवणे यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# सोनगाव-सात्रळात 'शिक्षण' की 'लुटारू बाजार'?

## बालपण वेचणाऱ्या शिकवणी साम्राज्याविरुद्ध पालकांचा संताप ; प्रशासन झोपेत?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील सोनगाव-सात्रळ परिसरात खाजगी शिकवणी वर्गांचे अक्षरशः साम्राज्य उभे राहिले असून, शिक्षणाचे पवित्र क्षेत्र आता उघडपणे व्यवसायाच्या विळख्यात सापडल्याचे चित्र आहे. बालवाडीतल्या चिमुकल्यांपासून दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांनाच क्लास नावाच्या जाळ्यात ओढले जात आहे. शाळा म्हणजे औपचारिकता आणि क्लास म्हणजे खरे शिक्षण अशी विकृत मानसिकता जाणीवपूर्वक तयार केली जात असल्याचा आरोप संतप्त पालकांनी केला आहे.

गेल्या काही वर्षांत परिसरात कोचिंग क्लासेसचे अक्षरशः पीक आले आहे. जेईई, नीट, सीईटी यांसारख्या स्पर्धा परीक्षांचे गाजर दाखवत टॉप रँक, हमखास यश, १०० टक्के निकाल अशा भडक जाहिरातींनी पालकांची दिशाभूल केली जात आहे. मुलांच्या गुणवत्तेपेक्षा पालकांच्या भीतीवर आणि असुरक्षिततेवर डल्ला मारला जात असल्याचे स्पष्ट होत आहे. शिक्षणाच्या नावाखाली सुरू असलेली ही पैशांची उधळण ग्रामीण कुटुंबांसाठी अक्षरशः कर्जाचा फास ठरत आहे. सकाळी शाळा, दुपारी गृहपाठ आणि संध्याकाळी दोन-तीन तास क्लास या चक्रात मुलांचे बालपण हरवत आहे. आठवड्याला चाचण्या, सततची गुणांची तुलना, टॉपरांची पोस्टरबाजी यामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड ताणतणाव निर्माण होत असल्याची तक्रार वाढत आहे. काही पालकांनी मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याची माहिती दिली.

आमची मुलं आता हसत नाहीत; फक्त गुणांच्या भीतीत जगतात, अशी वेदनादायी प्रतिक्रिया एका आईने व्यक्त केली. ग्रामीण भागातील अनेक पालक मोलमजुरी करून शाळा आणि क्लासची दुहेरी फी भरत आहेत. काहीजण कर्जबाजारी झाले आहेत. अधिक धक्कादायक म्हणजे शासनाचा पगार घेणाऱ्या काही शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना खासगी क्लासेसकडे वळवण्याचा दबाव टाकल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. शाळेत कमी शिकवायचे आणि क्लासमध्ये जास्त अशी दुहेरी भूमिका घेत मोठ्या प्रमाणावर उलाढाल होत असल्याची चर्चा रंगली आहे. शिक्षण विभाग मात्र मौन बाळगून असल्याने प्रश्न अधिकच गंभीर झाला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासमध्ये प्रवेश देण्यास बंदी, भरघोस गुणांची हमी देण्यास मनाई, नियमभंग केल्यास दंड आणि नोंदणी रद्द करण्याची तरतूद अशा कठोर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

प्रत्येक क्लासकडे अधिकृत वेबसाईट, शिक्षकांची किमान पात्रता, पारदर्शक शुल्करचना, मानसोपचार सत्रे आणि गोपनीय मूल्यमापन या अटी बंधनकारक करण्यात आल्या आहेत. परंतु सोनगाव-सात्रळ परिसरात या नियमांचे पालन कितपत होते, याची चौकशी करण्याचे धाडस प्रशासन दाखवणार का, असा सवाल उपस्थित होत आहे. कागदावर नियम आणि प्रत्यक्षात मनमानी अशी स्थिती असल्याची टीका होत आहे. सोनगाव-सात्रळ परिसरात शिक्षण विभागाने तातडीने सर्व क्लासेसची चौकशी करून बेकायदा, नियमबाह्य आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याशी खेळ करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करावी, अशी एकमुखी मागणी होत आहे.

## आरोग्य तपासणी शिबिरात शेकडो महिलांनी केली आरोग्य तपासणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहाता** : तालुक्यातील नपावाडी येथे विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. ग्रामपंचायत नपावाडी व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मोफत तपासणी शिबिरात शेकडो महिलांनी सहभाग घेतला. या शिबिराचे उद्घाटन सरपंच पल्लवी इले यांनी केले. यावेळी उपसरपंच दीपक वहाडणे , तंटामुक्त समितीचे अध्यक्ष , पोलीस पाटील योगिनी धनवटे, राजेंद्र धनवटे ,रामनाथ वहाडणे, संदीप बनकर, ग्रामपंचायत अधिकारी एस व्ही कोतकर अदी उपस्थित होते. आरोग्य तपासणी शिबिरात तपासणी सोबतच महिलांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये पौष्टिक आहार, स्वच्छता, कुटुंब नियोजन व नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व पटवून देण्यात आले. डॉक्टरांनी सांगितले की, बहुतांश आजारांचे वेळीच निदान झाल्यास ते बरे करता येतात.

महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नये असेही त्यांनी सांगितले. शेवटी कार्यक्रमाचे आभार मानताना ग्रामपंचायत अधिकारी एस व्ही कोतकर महिलांना मार्गदर्शन करताना ग्रामीण भागात अशा आरोग्य शिबिरांची नितांत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. भविष्यातही अशा शिबिरांचे आयोजन केले जाईल असेही त्या म्हणाल्या. शेवटी सरपंच पल्लवी इले यांनी आभार मानले.

> **रक्तदाब (बीपी) व मधुमेह (शुगर) तपासणी**
>
> रक्तक्षय (ॲनिमिया) तपासणी, महिलांमधील होणारे सामान्य आजार व संसर्गजन्य रोगांवर उपचार, गरोदर महिलांची विशेष तपासणी व समुपदेशन, स्तनाचा कर्करोग व गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग याबाबत मार्गदर्शन व तपासणी करण्यात आले.

## एसटीचे नवीन एनसीएमसी कार्ड घेण्यासाठी श्रीरामपूर आगारात ज्येष्ठांची गर्दी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने नवीन एन सी एम सी हे डिजिटल कार्ड देण्याची श्रीरामपूर आगार येथे सुविधा झाल्यामुळे ज्येष्ठ महिला पुरुष नागरिकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी पहावयास मिळते.त्यासाठी तासंतास प्रतीक्षा करावी लागते गर्दी .विचारात घेता त्या ठिकाणी या योजनेचे महिलांसाठी एक व पुरुषासाठी एक असे दोन टेबलवर काम करण्यात आले तर ज्येष्ठ नागरिकांना लवकर सुविधा मिळू शकते याचा विचार करणे आवश्यक आहे.अशी सूचना जेष्ठ नागरिक संघटना उपाध्यक्ष वसंतराव मुठे यांनी मांडली, त्यावर व्यवस्थापक यांनी आश्वासन दिले की येथे आता गर्दी होणार नाही लवकरच ही सुविधा देणारीं ४ते ५ केंद्रे शहरात सुरु करणार आहोत.त्यामुळे गर्दी कमी होऊन जेष्ठ नागरिकांची गैरसोय होणार नाही. तरी नागरिकांनी गर्दी करू नये हे काम बरेच दिवस चालणार असल्याने वेगवेगळ्या सुविधा केंद्रावर जावे व एसटी महामंडळाचे नवीन एन सी एम सी डिजिटल कार्ड काढून घ्यावे त्यासाठी फक्त मोबाईल व आधार कार्ड ची आवश्यकता आहे अनेकांनी नवीन कार्ड योजनेत नोंदणी केली नोंदणी केल्यावर साधारण एक महिन्यांनी सदर कार्ड आपल्याला मिळेल असे सुविधा केंद्राकडून सांगण्यात आले .

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, श्रीरामपूर यांचेसमोर**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये जाहीर समन्स**

**कर्मयोगी मुरलीधर खटोड जनलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.**
**बेलापूर बु.ता. श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर**

**विरूद्ध** — **वादी**

**प्रतिवादी पुढील ०१ ते १२**

| अ.क्र | कर्जदार | जमिनदार | दावा क्रमांक | दावा रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | योगेश भगिरथ मुंडलिक, रा. बेलापूर, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर | १. सोमनाथ बद्रीनाथ नागले, रा. बेलापूर बु., ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर २. रत्नेश ज्ञानदेव गुलदगड, रा. बेलापूर, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर | ३००/२०२५-२६ | ७०९८८६/- |
| २ | अजय शोभाचंद डाकले, रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | १.संतोष शोभाचंद डाकले, रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर २. सारिका अनिल डाकले, रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | ३०१/२०२५-२६ | ११५०५९६/- |
| ३ | वैशाली नितीन वाबळे, रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | १. प्रताप गंगाधर साळुंके, रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर २. नितीन गंगाधर वाबळे (मयत) वारस १) वैशाली नितीन वाबळे २) निरज नितीन वाबळे, रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | ३०२/२०२५-२६ | ६४८०९२/- |
| ४ | सत्तार शब्बीर शेख (तांबोळी), रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | १. रामु मगन गुडे, रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर २. आसिफ हनिफ कुरेशी, रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर ३. चाँदबी इमाम तांबोळी, रा. बेलापूर, ता.श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर (सहकर्जदार) ५. मेहबूब इमाम तांबोळी (सहकर्जदार) , रा. बेलापूर, ता. श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर ६. हुसेन इमाम तांबोळी (सहकर्जदार) , रा. बेलापूर, ता. श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर ७. फरीदा शब्बीर तांबोळी (सहकर्जदार),रा. बेलापूर, ता. श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर ८. इरफान शब्बीर तांबोळी, रा. बेलापूर, ता. श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | ३०३/२०२५-२६ | २८५६५९२/- |
| ५ | रमेश कमलाकर अमोलिक, रा. बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर | १. सारंग राजेंद्र मिसाळ, रा. बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर २. अनिल बाळू तांबे, रा. बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर ३. | ३०४/२०२५-२६ | ७१०९८/- |
| ६ | वैशाली गणेश मुंडलिक, रा. बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | योगेश रमेश काळे(मयत), वारस १) रमेश गंगाधर काळे २) सुनंदा रमेश काळे ३) मिलिंद रमेश काळे ४) भारत रमेश काळे ५) प्रियंका योगेश काळे, ६) गौर्य योगेश काळे, रा. बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर २. रमेश रखमाजी कुटे, रा. बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर | ३०५/२०२५-२६ | ३२२४०८/- |
| ७ | गणेश भगीरथ मुंडलिक, रा. बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | १.रमेश रखमाजी कुटे, रा. बेलापूर बु., ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर २. विजय नामदेव कुऱ्हे, रा. बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर | ३०६/२०२५-२६ | ५६२४९८१/- |
| ८. | आसिफ आरिफ शेख, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | १. मोहसिन आयुब बागवान, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर २. सिराज कुतबुद्दीन शेख, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर | ३०७/२०२५-२६ | ४००४५/- |
| ९ | अनिल जनार्धन थोरात, रा. उक्कलगाव, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर | १.उज्वला गंगाराम भराडे, रा. श्रीरामपूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर २. अरूण जनार्धन थोरात, रा. उक्कलगाव, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर | ३०८/२०२५-२६ | १८१४१९/- |
| १० | सचिन अशोक गवते, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | १. संजय प्रभाकर गोत्राचे, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर २. सुभाष विठ्ठल मोहिते, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर ३. अशोक काशिनाथ गवते, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर | ३०९/२०२५-२६ | २१२१९०५/- |
| ११ | सारिका अनिल डाकले, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | १. सुनिल घेवरचंद डाकले, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर २. संजय घेवरचंद डाकले, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर | ३१०/२०२५-२६ | २५६३०४/- |
| १२ | सुनिल घेवरचंद डाकले, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर | १.माणिकराव माधवराव महाडीक, रा.बेलापूर खुर्द, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर २. सोपान गोपाळराव हिरवे, रा.बेलापूर, ता- श्रीरामपूर, जि-अहिल्यानगर | ३११/२०२५-२६ | १६०४४०५/- |

सदर दाव्याच्या कामी कर्मयोगी मुरलीधर खटोड जनलक्ष्मी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. बेलापूर बु.ता. श्रीरामपूर, जि- अहिल्यानगर यांनी सादर केलेल्या अर्जातील जाब देणार कर्जदार व जामीनदार यांना रजिष्टर पोष्टाने प्रथम सुनावणी नोटीस दि.२७/०१/२०२६ रोजी पाठविण्यात आलेल्या आहेत व त्याबाबतची सुनावणी दि. १७/०२/२०२६ रोजी ठेवण्यात आली होती परंतु वरील कर्जदार / जामीनदार यांना नोटीसा बजावल्या / न बजावल्या गेल्याने, त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्याने प्रथम सुनावणीस काही कर्जदार व जामीनदार हे नोटीस स्विकारूनही उपस्थित न राहील्याने सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

वरील दाव्यासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक १०/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता कागदपत्रांसह आपण या कार्यालयात उपस्थित रहावे. या समन्स व्दारे कर्जदारांना, जामीनदारांना असे कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण उपस्थित न राहील्यास आपल्या गैरहजेरीत या दाव्याची सुनावणी घेण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी. त्याचप्रमाणे वरील तारीख अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. सदरचे जाहीर समन्स आज दि. २६/०२/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह दिले आहे.

**सही/-**
**(आर. एल. गडेकर)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर**

## शिक्षणासोबतच सामाजिक बांधिलकी विद्यार्थ्यांनी जपावी : डॉ. सुस्मिता विखे

### प्रवरेत रक्तदान शिबिर संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लोणी** : शिक्षणासोबत विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. आपण या समाजाचे देणे लागतो. या भावनेतून विद्यार्थ्यांनी काम करावे. प्रवरेत शिक्षणासोबतच सामाजिक संस्कार मिळावे. सहकाराच्या माध्यमातून शिक्षणातून विद्यार्थ्यांनी पुढे जावे आणि यातून सामाजिक जाणीव निर्माण व्हावे यासाठी आयोजित केलेले रक्तदान शिबिर महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील यांनी केले.

ना. राधाकृष्ण विखे, शालिनीताई विखे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासोबतच विविध उपक्रम संपन्न होतात होत असतात याच अंतर्गत लोणी येथील फार्मसी, आय.टी.आय., पीव्हीपी ज्युनिअर तसेच पायरेन्स महाविद्यालय कॅम्पसमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. समाजसेवेची परंपरा जपत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मोठ्या संख्येने रक्तदान केले. संपूर्ण कॅम्पसमध्ये सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि मानवतेचा संदेश देणारे प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते. शिबिराचे उद्घाटन प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत, रक्तदान हेच खरे जीवनदान आहे. आपल्या एका पिशवी रक्तामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असे सांगितले. तसेच युवकांनी नियमित रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. एस. एन. हिरेमठ, आयटीआय कॉलेजचे प्राचार्य प्रा. अर्जुन आहेर,इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. आर. एस.जाधव, पायरेन्स आय.एम.बी. ए. कॉलेजचे डायरेक्टर डॉ.मोहसिन तांबोळी,पी.व्हि.पी. ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. डी.एन. घोलप, प्रवरा रुरल कॉलेज ऑफ फार्मसी, लोणी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. मंगाथायरू आदी मान्यवर उपस्थिती होते.

# आ. सत्यजित तांबे यांनी शिक्षण, कृषी व डिजिटल फसवणुकीवर सरकारचे लक्ष वेधले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**संगमनेर** : मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सत्यजित तांबे यांनी शिक्षण, कृषी व सायबर गुन्ह्यांबाबत अभ्यासपूर्ण मांडणी करत सरकारचे लक्ष वेधले. शिक्षण क्षेत्रातील वाढता भ्रष्टाचार रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. शिक्षक पात्रता परीक्षेतील (टीईटी) सक्तीबाबत बोलताना त्यांनी तीस वर्षे सेवा केलेल्या शिक्षकांना पुन्हा टीईटी देण्याची सक्ती अन्यायकारक असल्याचे सांगितले.

टीईटीच्या काठिण्य पातळीत सुसूत्रता आणण्यासाठी राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी, तसेच अल्पसंख्यांक संस्थांमध्ये टीईटी लागू आहे की नाही याबाबत स्पष्टता द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. शिक्षण क्षेत्रात सुरू असलेल्या भ्रष्टाचारामुळे चांगल्या शिक्षकांची बदनामी होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांवरही त्यांनी चिंता व्यक्त केली.

मायक्रो फायनान्स कंपन्या व बनावट गुंतवणूक योजनांद्वारे नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक होत असल्याचे सांगत कर्ज वसुलीवर मर्यादा, पारदर्शक प्रक्रिया व नागरिक संरक्षणाला प्राधान्य देणारे कठोर धोरण राबवावे, अशी मागणी त्यांनी केली. कृषी विद्यापीठांमधील घसरती गुणवत्ता, रिक्त प्राध्यापक पदे व संशोधन शेतकऱ्यांपर्यंत न पोहोचणे या मुद्द्यांवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून कृषी विद्यापीठांमध्ये आवश्यक भरती व गुणवत्ता वाढीसाठी तातडीने पावले उचलावीत, असे त्यांनी नमूद केले. यावेळी सभापती राम शिंदे यांच्यासह मंत्रिमंडळातील वरिष्ठ मंत्री उपस्थित होते.

## त्रिमूर्ती महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



नेवासा : त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व त्रिमूर्ती फार्मसी कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारताचे महान शास्त्रज्ञ सी. व्ही.रमण यांनी १९२८ साली लावलेल्या रमन परिणाम या महत्त्वपूर्ण शोधाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. त्यांच्या या संशोधनाबद्दल १९३० साली त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे सचिव मनीष घाडगे, सिनियर कॉलेजच्या समन्वयिका डॉ.अनुराधा गोरे, प्राचार्य डॉ. चांगदेव आरसुळे, प्रा.समीर ठाकूर, प्रमुख व्याख्याते प्रा. नामदेव कचरे हे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. निकिता बर्गे यांनी केले. त्यांनी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे महत्त्व स्पष्ट करत विज्ञान हा केवळ अभ्यासाचा विषय नसून तो जीवन शैलीचा भाग असल्याचे सांगितले. कार्यक्रमासाठी प्रा. निकिता बर्गे, प्रा.सोमनाथ खेडकर, प्रा. गोरख गुंड, प्रा. संतोष जावळे, प्रा. राहुल बोरुडे, प्रा. अनिकेत आरसुळे, प्रा. अश्विनी औटी, प्रा. प्रवीण आवारे, प्रा. मंगेश वैरागर, प्रा. गायत्री ढाकिफळे, प्रा. ज्योती दहातोंडे, प्रा. स्वप्नाली दरंदले, प्रा. सागर सोलट, प्रा. साईनाथ भवर, प्रा. अक्षय देवतरसे, प्रा. योगिता गायकवाड, प्रा. भोसले, प्रा. कराडे, प्रा. वंजारे, प्रा. पल्हारे प्रा. पठाडे सरला, प्रा. अनारसे स्नेहल आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. राहुल बोरुडे यांनी केले तर आभार अभिषेक दरंदले यांनी केले.

## पान १ वरुन

### कर्जमाफी आदेशाचे उल्लंघन........

निधी वितरित करण्याचे निर्देश दिले होते. या मुदतीतही कार्यवाही न झाल्याने आता नवीन अवमान याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. अजित काळे यांनी न्यायालयात बाजू मांडताना सांगितले की, राज्य सरकारने वारंवार शपथपत्रे सादर करून केवळ वेळकाढूपणा केला आहे. न्यायालयाला दिलेल्या आश्वासनानुसार केवळ १५० कोटी रुपये वितरित करण्यात आले, परंतु अजूनही ६.५६ लाख पात्र शेतकरी सुमारे ५,९८५ कोटी रुपयांच्या लाभापासून वंचित आहेत. ही बाब न्यायालयाचा अवमान करणारी असल्याचे ताशेरे ओढत न्या. संदीपकुमार मोरे आणि न्या. अबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. शेतकरी संघटनेने याप्रश्नी रस्त्यावरची आणि न्यायालयीन लढाई सुरूच ठेवणार असल्याचे जाहीर केले असून, आता १२ मार्च रोजी होणाऱ्या सुनावणीकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

### प्रेयसीची गोळ्या झाडून हत्या

माहिती पोलिसांनी दिली. मात्र, गेल्या काही दिवसांपासून अनिता देवानंदला टाळत असल्याने त्यांच्यात वाद निर्माण झाला होता. या रागातूनच देवानंद धनगर याने अनितावर गोळ्या झाडून तिची हत्या केली आणि त्यानंतर स्वतःवर गोळ्या झाडून आत्महत्या केल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

या घटनेमागील नेमके कारण, वापरण्यात आलेली बंदूक आणि ती कुठून आणली याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. परिसरात या घटनेमुळे मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

### इराणने ५ देशांवर मिसाईल्स डागल्या!

सुरक्षितस्थळी जाण्याची सूचना देण्यात आली आहे. हल्ल्यानंतर इस्रायलने आणीबाणीची स्थिती जाहीर केली. गेल्या काही मिनिटांत, इस्रायलमध्ये सायरन वाजले आणि सुरक्षित ठिकाणांजवळ राहण्यासाठी सेल्युलर उपकरणांना प्रगत सूचना देण्यात आल्या. इस्रायलकडे क्षेपणास्त्रे डागण्याची शक्यता असल्याने जनतेला तयार करण्यासाठी हा इशारा देण्यात आला आहे. आयडीएफने लोकांना सुरक्षित ठिकाणांजवळ राहण्याचे आवाहन केले आहे. तेल अविवमधील सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. इराणवरील इस्रायलचे हल्ले नियोजनबद्ध असून अमेरिकेला त्या ठिकाणी पूर्ण सत्तांतर करून घ्यायचे आहे. त्यामुळेच इस्रायलचे काही हल्ले तेहरानमधील आयातुल्ला खोमनेई च्या हेडक्वार्टर जवळ झाले आहे. इराणचा माजी राजा शहा सुद्धा इराणमध्ये परत येण्यास तयार आहे. मात्र, हे होत असताना रशिया आणि चीन आयातुल्ला खोमनेईच्या बाजूने युद्धात उतरले, तर जागतिक युद्धाची स्थिती निर्माण होऊ शकते, अशी शंका संरक्षण तज्ज्ञ मेजर जनरल अनिल बाम यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, इस्रायल-इराण युद्धाच्या माध्यमातून मध्यपूर्व आशियात युद्धजन्य परिस्थिती निर्माण होऊन त्याचे परिणाम भारतावरही होईल असे मेजर जनरल अनिल बाम म्हणाले.

इस्रायलचा इराणची राजधानी तेहरानवर हल्ला - इस्रायलने इराणची राजधानी तेहरानवर हल्ला केला. अणु करारावरून अमेरिका आणि इराणमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आणि मध्य पूर्वेत अमेरिकेच्या संभाव्य हल्ल्याच्या भीतीच्या पार्श्वभूमीवर हा हल्ला करण्यात आला आहे. तेहरानच्या युनिव्हर्सिटी स्ट्रीट आणि जोमहोरी भागात अनेक क्षेपणास्त्रे पडली, तर तेहरानच्या मध्यभागी पाश्चर स्ट्रीटवरून दाट धुराचे लोट उठताना दिसत होते.

### जेवणाच्या वादातून रचला मृत्यूचा कट..!

नगर तालुका पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. मैत्रीच्या नात्यातून उभा राहिलेला हा हत्येचा कट उघड झाल्याने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे. वादातून पेटलेला राग आणि मित्रांनीच घेतला मित्राचा जीव आणि अपघाताचा बनाव नगर तालुक्यातील या थरारक प्रकरणाने गुन्हेगारीचे भयावह रूप पुन्हा एकदा समोर आणलं आहे.

### केजरीवालांची 'जंतरमंतर'वरून पुन्हा गर्जना

हे विधान आता आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि समर्थकांमध्ये विश्वासाचे प्रतीक बनले आहे. पक्षाचे म्हणणे आहे की खोटे आरोप असूनही, केजरीवाल खंबीरपणे उभे राहिले आणि ते पूर्वीपेक्षाही अधिक मजबूत झाले आहेत. आम आदमी पक्षाचे दिल्ली अध्यक्ष सौरभ भारद्वाज म्हणाले की रविवारची रॅली ऐतिहासिक असेल. त्यांनी सांगितले की संपूर्ण राष्ट्रीय नेतृत्व, मग ते गुजरात, गोवा, पंजाब किंवा दिल्लीचे असो, सकाळी ११ वाजता जंतरमंतरवर उपस्थित राहील. या रॅलीत उठवलेला आवाज संपूर्ण देशात पोहोचेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.पक्षाचा असा विश्वास आहे की हा केवळ कायदेशीर विजय नाही तर नैतिक देखील आहे. समर्थकांना वाटते की प्रामाणिकपणा दाबता येणार नाही. लोक केजरीवाल यांच्या मोफत वीज आणि पाणी, सुधारित सरकारी शाळा आणि दिल्लीतील मोहल्ला क्लिनिक यासारख्या उपक्रमांना त्यांच्या हेतू आणि विचारसरणीची उदाहरणे मानतात. सर्वांच्या नजरा आता जंतरमंतरवरील रॅलीकडे आहेत, जिथे अरविंद केजरीवाल त्यांचे विचार राष्ट्रासमोर मांडतील. आम आदमी पक्षाचे कार्यकर्ते याला एक नवीन सुरुवात मानत आहेत. त्यांच्या मते, ही रॅली केवळ दिल्लीसाठीच नाही तर संपूर्ण देशाला संदेश देईल की जर एखादा नेता संघर्षानंतरही खंबीरपणे उभा असेल तर तो अत्यंत प्रामाणिकपणाच्या आधारावर उभा आहे.

# गंगापूर वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.अनील इंगळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. अनील इंगळे तर उपाध्यक्ष तुकाराम कोल्हे सचिव राहुल माघाडे यांची निवड करण्यात आली आहे.

गंगापूर वकील संघाच्या निवडणुकीच्या अध्यक्षपदासाठी ॲड.अनील इंगळे,अविनाश चव्हाण महेंद्र राऊत ,यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते यामध्ये ॲड.अनील इंगळे व ॲड .अवीनाश चव्हाण व महेंद्र राऊत यांच्या मध्ये लढत होऊन अनिल इंगळे यांना ६३ मते तर ॲड.अविनाश चव्हाण यांना ४९ मते तर ॲड.महेंद्र राऊत यांना ३ मते पडले. ॲड.अनील इंगळे यांना ६३ मते पडल्याने निवडणूक निर्णय अधिकारी ॲड.अविनाश कुलकर्णी यांनी ॲड.अनील इंगळे यांना विजयी घोषित केले आहे.



यावेळी उपाध्यक्ष पदासाठी ॲड.तुकाराम कोल्हे, ॲड.संदीप तारू,ॲड.मयूर मोकळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते तुकाराम कोल्हे यांना ६० मते, संदीप तारु यांना ५३ मते तर मयुर मोकळे यांना २ मते पडले ॲड.तुकाराम कोल्हे यांना ६० मते पडल्याने त्यांना विजय घोषित करण्यात आले.

सचिव पदाकरिता ॲड.आसिफ शहा , ॲड.राहुल माघाडे,ॲड. सुदर्शन पारदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते यामध्ये ॲड.आसीफ शहा यांना ५० मते ॲड.राहुल माघाडे यांना ५५ मते तर ॲड.सुदर्शन पारदे यांना ११ मते पडले ॲड.राहुल माघाडे यांना ५५ मते पडल्याने निवडणूक निर्णय अधिकारी अवीनाश कुलकर्णी यांनी गंगापूर वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड अनील इंगळे तर उपाध्यक्ष तुकाराम कोल्हे सचिव म्हणून राहुल माघाडे यांना विजय घोषित केले.

यावेळी एकुण ११७ मतदान झाले यामध्ये २ मते बाद झाली असून निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अवीनाश कुलकर्णी यांनी काम पाहिले.यावेळी वकील संघाकडून गुलालाची उधळण करत फटाके फोडुन आनंद उत्सव साजरा करण्यात आला यावेळी सर्व वकील बांधवांनी नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष, तसेच सचिव यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## निधन वार्ता

### सियाराम पवार



**पुणतांबा :** येथील सियाराम रेस्टॉरंटचे मालक सियाराम रामसिंग पवार ( वय ६५ ) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले एक मुलगी पुतणे नातू पणतू असा परिवार आहे. महेश व सूरज यांचे ते वडील तर गणेश पवार यांचे चुलते होते.

### शामराव फोपसे



**गोंडेगाव :** येथिल शामराव लक्ष्मण फोपसे वय (८०) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्च्यात पत्नी दोन मुले, दोन मुली, पुतणे, नातवंडे असा परिवार असून ते गोंडेगावचे प्रगतशिल शेतकरी सुनिल फोपसे व सामाजिक कार्यकर्ते संदीप फोपसे यांचे वडील होत.

### ज्ञानेश्वर भागवत



**श्रीरामपूर-** तालुक्यातील गळनिंब येथील ज्ञानेश्वर सखाराम भागवत (वय ७२) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.गोंधवणी येथील काशिनाथ भागवत व गळनिंब येथील प्रगतशील शेतकरी विश्वनाथ भागवत यांचे ते बंधू तर लोणी येथील पद्मश्री विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. लक्ष्मीकांत भागवत यांचे वडील तर पत्रकार-चित्रकार रवि भागवत यांचे ते चुलते होत.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत सहा वर्षीय मुलाचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर-पुणे महामार्गावरील कायगावजवळील अमळनेरच्या जोशी फाट्यावर अज्ञात वाहनाच्या धडकेत सहा वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी (दि. २७) सकाळी दहाच्या सुमारास घडली. विशाल अंकुश पवार (वय ६, रा. पोळ, रांजणगाव ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) असे मृत मुलाचे नाव आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लखमापूर शिवारात ऊसतोडणीसाठी आलेले कामगार हंगाम संपल्यानंतर आपल्या मूळ गावी पायी निघाले होते. यावेळी पुण्याहून छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या भरधाव अज्ञात वाहनाने पाठीमागून जोराची धडक दिली. धडकेचा जोर इतका तीव्र होता की, आई-वडिलांसमोरच चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर आईने केलेला आक्रोश उपस्थितांच्या काळजाला पिळवटून गेला. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदत करत मुलाला गंगापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. हर्षल ढाबे यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. तपास कायगाव बिटचे पोलीस नाईक व्ही. बी. जाधव करीत असून, घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# मूत्रपिंडाच्या आजारावर शासकीय रुग्णालयात मोफत सेवा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** आमदार प्रशांत बंब यांच्या सहकार्याने गंगापूर तालुक्यातील व परिसरातील मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त रुग्णांसाठी शासकीय रुग्णालय, गंगापूर येथे डायलिसिस सेवा पूर्णपणे मोफत सुरू करण्यात आली आहे.



या उपक्रमामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या रुग्णांना मोठा आधार मिळणार आहे.ही सेवा केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री राष्ट्रीय डायलिसिस कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात येत असून राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्फत शासकीय रुग्णालयांमध्ये बीपीएल प्रवर्गातील रुग्णांसाठी मोफत डायलिसिस सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मुत्रपिंडाच्या आजारावर नियमित डायलिसिस करणे अत्यावश्यक असते; मात्र उपचारांचा खर्च मोठा असल्याने अनेक रुग्णांना आर्थिक ताण सहन करावा लागत होता. नव्याने सुरू झालेल्या या सेवेने रुग्णांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. तालुक्यातील गरजू रुग्णांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. काही अडचण अथवा मार्गदर्शनासाठी आमदार प्रशांत बंब संपर्क कार्यालय तसेच रुग्ण कल्याण समिती सदस्य अतुल रासकर यांच्याशी मो. ९७३०९८३९९९ वर संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# अल्पवयीन मुलीला पळवणारा आरोपी ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** नवनाथनगर, सोनई येथील एका अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेल्या प्रकरणी आरोपीस मुलीसह ताब्यात घेण्यात सोनई पोलिसांना यश आले आहे. न्यायालयाने आरोपीस २ मार्च २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

यााबाबत सोनई पोलीस ठाण्यात संबंधित मुलीच्या आईने तक्रार दाखल केली होती. त्यानुसार अपहरणाचा गुन्हा नोंदवून तपास हवालदार तागड यांच्याकडे सोपविण्यात आला. हवालदार तागड व पोलीस शिपाई गणेश गावडे यांनी तात्काळ तपास सुरू करून तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा शोध घेतला.



२७ फेब्रुवारी २०२६ रोजी वडगाव गुप्ता येथून अक्षय रामदास सोनावणे (वय २०, रा. नवनाथनगर, सोनई) यास अल्पवयीन मुलीसह ताब्यात घेण्यात आले. मुलीच्या जबाबानुसार गुन्ह्यात वाढीव कलमे लावण्यात आली आहेत.

आरोपीस अटक करून न्यायालयात हजर केले असता २ मार्चपर्यंत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मेढे करीत आहेत.

# नैसर्गिक उपचार स्वीकारल्यास आरोग्य सुदृढ : सरपंच नासेर पटेल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** दैनंदिन जीवनात शक्य तितक्या प्रमाणात आयुर्वेदिक औषधांचा वापर करावा. लहान-मोठ्या आजारांवर नैसर्गिक उपचार पद्धती स्वीकारल्यास आयुष्यमान वाढून आरोग्य सुदृढ राहते, असे प्रतिपादन नारायणपूर (बू.) ग्रामपंचायतीचे सरपंच नासेर पटेल यांनी केले.

राष्ट्रीय आयुष मिशन अंतर्गत 'आयुष ग्राम' म्हणून निवड झालेल्या नारायणपूर (बू.) येथील आदर्श ग्रामपंचायत कार्यालयात आयुर्वेद व योग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी सरपंच नासेर पटेल तर प्रमुख पाहुणे म्हणून चेअरमन सब्जर पटेल उपस्थित होते. उपसरपंच मजीद शेख व ग्रामविकास अधिकारी स्वप्निल घरमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाची सुरुवात धन्वंतरी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रंगनाथ तुपे यांनी आयुर्वेदाचे महत्त्व उदाहरणांसह स्पष्ट केले. धावपळीच्या जीवनशैलीत आयुर्वेदिक उपचार किती प्रभावी ठरतात, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक प्रशिक्षण देण्यात आले. समारोप प्रसंगी ग्रामविकास अधिकारी घरमोडे यांनी नियमित योग-प्राणायाम व आयुर्वेदिक उपचारांचा अवलंब केल्यास निरोगी आयुष्य साध्य होऊ शकते, असे सांगितले.कार्यक्रमास आरोग्य विभागाचे अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, आशा वर्कर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सुवर्णा कुलकर्णी यांनी केले.

# आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विलास साळवे; उपाध्यक्षपदी पिंटू साळवे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राजवाडा परिसरातील जयभीम मित्र मंडळाच्या वतीने आयोजित नियोजन बैठकीत उत्सव भव्य व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत जयंती उत्सव समितीची निवड सर्वानुमते करण्यात आली.

अध्यक्षपदी विलास साळवे, उपाध्यक्षपदी पिंटू साळवे, खजिनदार पदी दादू साळवे तर कार्याध्यक्षपदी दीपक रामजी साळवे यांची निवड झाली. अध्यक्ष विलास साळवे यांनी उत्सव समाजभिमुख व प्रेरणादायी स्वरूपात साजरा करण्याचा संकल्प व्यक्त केला.नगरसेवक अरुण साळवे यांनी यंदा पाच दिवस विविध कार्यक्रमांची रेलचेल राहणार असल्याचे सांगितले. यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, समाजजागृती उपक्रम, बौद्ध धम्मवाचन, प्रभातफेरी, व्याख्याने व स्पर्धांचा समावेश असणार आहे. सर्वांनी मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने उत्सव साजरा करावा, असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले.

बैठकीस परिसरातील नगरसेवक, माजी नगरसेवक, तरुण कार्यकर्ते, महिला मंडळ सदस्य व आंबेडकरी चळवळीचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME VAISHALI SHANKARGIR GOSAVI (NAME AS PER SCHOOL LEAVINGCERTIFICATE) TO NEW NAME AS VAISHNAVI SHIVDATTA GOSAVI VIDE AADHAR NO. 9376 8044 4386.

**CHANGE OF NAME**

I have changed my mother's name from Hema Pramod Nalkande to Hemlata Pramod Nalkande. Henceforth, She shall be known as Hemlata Pramod Nalkande. Place: Newasa.

## असे 'अण्णासाहेब' आता होणे नाही !

श्रीरामपूरचे नाव देशभर आपल्या कर्तुत्वाने व आदर्श वर्तनाने पसरविले असे शेतकऱ्यांचे खरेखुरे कैवारी आणि शेती क्षेत्रामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाने मोलाची भर घालणारे तसेच देशाला अन्नधान्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यात ज्यांचा मोठा वाटा आहे असे श्रीरामपूरचे वैभव असलेले श्री अण्णासाहेब पांडुरंग शिंदे हे एक आदर्श राजकारणी असूनही राजकारणापासून जे सातत्याने दूर राहिले आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा निष्कलंक ठसा ज्यांनी उमटविला ते अभ्यासू व्यक्तिमत्व काळाच्या पडद्याआड जाऊन दोन तपापेक्षा अधिक काळ लोटला आहे तरीही त्यांची स्मृती आदर्श राजकारणी म्हणून राज्याच्या आणि देशाच्या स्मृती पटलावर आहे.

आदरणीय अण्णासाहेब शिंदे यांची राजकीय कारकीर्द कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यापासून सुरू झाली. संपूर्ण नगर जिल्हा त्यावेळी जबरदस्त कम्युनिस्ट चळवळीमुळे लाल झाला होता त्यात अण्णासाहेब शिंदे यांच्यासारखा संयमी आणि कुशल नेतृत्व करणारा नेता काँग्रेसला हवा होता. अण्णासाहेब शिंदेंना काँग्रेसमध्ये खेचून आणण्यात त्या वेळी काँग्रेस यशस्वी झाली . अण्णासाहेब शिंदे काँग्रेसमध्ये येऊन त्यांच्या ज्ञानाचा व कामाचा उपयोग पक्षासह देशालाही झाला ही फार मोठी बाब आहे. अण्णा साहेबांच्या कार्यावर तसेच त्यांच्या योजनांवर कधी टीका झाल्याचे दिसून येत नाही.वैयक्तिक जीवनातही ते अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने वागत. आपण टीकेचे धनी होणार नाही याबाबत ते फार दक्ष असत. त्यांचा मोठा मुलगा अशोक यांनी राहुरीच्या कृषी विद्यापीठात प्रवेश घेतला होता. एका वृत्तपत्रात त्याबाबत किरकोळ स्वरूपाची नकारात्मक बातमी प्रसिद्ध झाल्याचे समजताच अण्णासाहेबांनी विद्यापीठातील प्रवेश रद्द करून मुलाला आता शेती करण्याचा सल्ला दिल्याचे जाहिर करून टाकले.आता मुलांचे मार्क वाढवून घेण्यासाठी किंवा पास करून घेण्यासाठी विविध प्रकारच्या क्लुप्त्या लढवणारे नेते कुठे आणि ते अण्णासाहेब शिंदे कुठे ? भ्रष्ट असलेले राजकारणी यातून कांही धडा घेऊ शकतील काय ?

अण्णासाहेब शिंदे दिल्लीहून येताना अनेकदा ट्रेननी येत.

सकाळी सहा- सातच्या दरम्यान पहिली पॅसेंजर ट्रेन श्रीरामपूरमध्ये येई.अण्णासाहेब रेल्वे स्टेशनवर उतरले की हमालाच्या डोक्यावर त्यांची बॅग देऊन ,छोटी बॅग स्वतः हातात घेऊन चालत त्यांच्या बंगल्यापर्यंत पायी येत. कुणाची कार अथवा अन्य वाहन बोलवत नसत.




सकाळी फिरायला जाणारे लोक एवढा मोठा नेता पायी जातोय हे पाहत.अधून मधून त्यांची व्याख्याने बोरावके महाविद्यालयात तसेच डाकले महाविद्यालयात प्रासंगिक आयोजित केली जात. अभ्यासपूर्ण त्यांची व्याख्याने ऐकण्याची संधी विद्यार्थांना मिळत असे. शिक्षकांचे पगार वाढले पाहिजेत असा त्यांचा दृष्टीकोन असे. जपान सरकारने त्यांच्या मंत्र्याइतका पगार

शिक्षकांना दिल्याने जपान मधील शैक्षणिक प्रगती झपाट्याने झाल्याचे ते सांगत. आपल्याकडे आता शिक्षकांचे पगार वाढलेले आहेत परंतु शिक्षणाचा दर्जा वाढवण्याबाबत दोन्ही बाजूंनी काय प्रयत्न होतो हे पाहणे गरजेचे आहे.विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे हा यशवंतराव चव्हाण यांचा विचार अण्णासाहेबांच्या तोंडून ऐकायला मिळत असे. अन्नधान्याबाबत भारत स्वयंपूर्ण झाला पाहिजे याबाबत अण्णासाहेब शिंदे आग्रही असंत .गव्हाच्या बाबतीत विविध प्रकारच्या शास्त्रज्ञांची संपर्क साधून व कृषी विद्यापीठांना संशोधनामध्ये मोठ्या प्रमाणात मार्गदर्शन व अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्याचे काम अण्णासाहेब शिंदे यांनी केल्यामुळे भारत गव्हाच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालेला दिसत आहे.अन्नधान्य बरोबरच दुधाची धवलक्रांती झाली पाहिजे हे पण त्यांचे स्वप्न होते. त्याबाबतही मोठ्या प्रमाणात त्यांनी मार्गदर्शन करून दुधाचा महापूर ही संकल्पना पुढे आणली आणि ती यशस्वी झाली. निवडून आल्यावर पार्लमेंटरी सेक्रेटरी पदापासून सुरुवात करून आपल्या अभ्यासपूर्ण शैलीने त्यांनी अन्नमंत्री पदापर्यंत झेप घेतली. आपल्या पदाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबातील कुणा सदस्याला अथवाआपल्या मुलांची ''राजकिय सोय '' त्यांनी कधी लावली नाही. आता आपल्या पुढच्या पिढयांची ''सोय '' लावण्यासाठी किती धडपड केली जाते हे सारा देश पाहतो आहे. महणूनच म्हणावेसे वाटते असे अण्णासाहेब आता होणे नाही.

## नशिबाची परिक्षा

रविवार दि . १ मार्च २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१४० २३० ७८० | ५-१ | १४६ ४७० ३४४

जोड ५८-०१-२७-६४-१९

**कल्याण**

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१२५ २६० ४४० | ८-२ | १५६ १२९ ११०

जोड ८६-४२-०१-५३-२९

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

२९० ४९० ५६० | १-० | १९० २८० ४६०

जोड १३-६०-२७-९५-०८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# गोदड महाराजांच्या पुजारी, सेविकाऱ्यांना अंधारात ठेवत

## अनधिकृत ट्रस्ट स्थापन केल्याच्या निषेधार्थ कर्जत बंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : संत सद्गुरु गोदड महाराज अठरा-पगड जातीसाठी श्रद्धास्थान असून त्यांची अस्मिता आणि पावित्र्य सर्वांनी जपलेच पाहिजे. राजकीय मतभेद मंदिराच्या आणि गावाच्या बाहेर करावे. ट्रस्टमध्ये सर्व जाती-धर्मांस स्थान असावे. ती कोणा एका कुटुंबाची मक्तेदारी नसावी. ज्यांनी संत सद्गुरु गोदड महाराजांची सेवा, भक्ती केली त्यांनाच बाजूला करण्याचे पाप काही मंडळी करीत असून हे महाराजांचे भक्त कधीच खपवून घेणार नाहीत.

समस्त कर्जतकरांना अंधारात ठेवत अनधिकृत ट्रस्ट स्थापन झाले आहे ते तातडीने बरखास्त करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. शनिवारी कर्जतचे ग्रामदैवत संत सद्गुरू गोदड महाराज समाधी मंदिर येथे अनाधिकृतपणे व एकाधिकारशाहीने रथयात्रा उत्सव, जन्मोत्सव, पालखी उत्सव, समाधी सोहळा (भंडारा), अखंड हरिनाम सप्ताह उत्सवातील मानकरी तसेच गोदड महाराजांनी पूजेच्या मान दिलेली पुजारी तसेच पंचक्रोशीतील भाविक भक्तांना अंधारात ठेवून ट्रस्ट स्थापन केल्याच्या निषेधार्थ मंदिरासमोर धरणे आंदोलन करीत कर्जत बंदची हाक देण्यात आली होती.



या प्रसंगी मानकरी संतोष नलवडे, नामदेव राऊत, दत्तात्रय शिंदे, आप्पा तोरडमल, अंबादास पिसाळ, अड बाळासाहेब शिंदे, संतोष मेहेत्रे यांच्यासह आदींनी धर्मदाय आयुक्त यांच्या मनमानी कारभारा विरोधात आणि गावातीलच काही मोजक्या मंडळी मंदिराचे पावित्र्य धोक्यात आणून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करीत आहे. वास्तविक पाहता संत सद्गुरु गोदड महाराजांचे मंदिर हे सर्वांसाठी श्रद्धास्थान असताना मागील काही दिवसांपासून या ठिकाणी सर्वच धार्मिक कार्य वेगवेगळे करण्याचा पायंडा पडला आहे. हे समस्त कर्जतकर, पूजेकरी, मानकरी, सेवेकरी आणि भाविक भक्तांना न रुजणारे आहे. यांच्या राजकीय हस्तक्षेपामुळे मंदिरात येणाऱ्या भाविकांची संख्या कमी झाली आहे.

यामुळे संत सद्गुरु गोदड महाराज मंदिरात कोणी ही राजकारण आणू नये. आणि झालेला राजकीय विळखा तात्काळ दूर करावा तसेच मंदिराचे पावित्र्य सर्वांनी अबाधित राखावे असे आवाहन उपस्थितांनी केले. यावेळी सर्वच आंदोलकांनी तीव्र भावना व्यक्त करताना सदरचे अनधिकृत ट्रस्ट धर्मादाय आयुक्त आणि लोकप्रतिनिधी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, आमदार रोहित पवार यांनी लोकभावना लक्षात घेत तातडीने बरखास्त करावे अशी एकमुखी मागणी केली. यावेळी मंदिराच्या समोर भजन, कीर्तन करीत प्रशासनास जाग आणली.

### ग्रामस्थांना अंधारात ठेवत अनधिकृत ट्रस्ट स्थापन केल्याच्या निषेधार्थ कर्जत कडकडीत बंद

कर्जतचे ग्रामदैवत संत सद्गुरु गोदड महाराज यांच्या सेवेकरी, पूजेकरी आणि मानकऱ्यासह भाविक भक्तांना अंधारात ठेवत अनधिकृत ट्रस्ट स्थापन केल्याच्या निषेधार्थ शनिवारी कर्जतची बंदची हाक देण्यात आली होती. यावेळी सर्व व्यापारी बांधवांनी आपले व्यवहार कडकडीत बंद ठेवत यास पाठींबा दिला.

---

द•ख•ल

## करडवाडीत समनक जनता पार्टीची शाखा स्थापन



**करंजी** : न्याय व हक्कांसाठी संघटित होणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन समनक जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक तारू चव्हाण यांनी केले. पाथर्डी तालुक्यातील करडवाडी येथे पक्षाची शाखा स्थापन करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. चव्हाण म्हणाले, राष्ट्रीय महासचिव डॉ. अनिल राठोड व प्रदेशाध्यक्ष डॉ. रामकृष्ण कालापहाड यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात गावागावांत शाखा उभारण्याचा संकल्प आहे. शोषित, उपेक्षित, ओबीसी व भटक्या विमुक्त समाजाला न्याय व अधिकार मिळवून देण्यासाठी पक्ष कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी तालुका उपाध्यक्ष भाऊसाहेब क्षेत्रे यांच्या उपस्थितीत पंडित जाधव (जिल्हा संघटक), राजू राठोड (तालुका कार्याध्यक्ष), संतोष जाधव (तालुका सचिव) आदींच्या निवडी जाहीर करण्यात आल्या. तसेच अनेक कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला.

## महाराणी ताराबाई कन्या विद्यालयाचा एनएमएमएस मध्ये दणदणीत यश



**अहिल्यानगर** : केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयच्या विद्यार्थिनींनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकांसाठी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (एनएमएमएस) मध्ये यंदा घवघवीत यश संपादन केले आहे. दरवर्षी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन व शिष्यवृत्ती मिळावी या उद्देशाने ही परीक्षा घेतली जाते. यंदा विद्यालयातील एकूण ३७ विद्यार्थिनींनी परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी तब्बल ३१ विद्यार्थिनीना यश मिळालेले असून, हा निकाल अत्यंत कौतुकास्पद लागला आहे. प्रांजल वाघमारे हिने १४६ गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. अक्षरा झाडे आणि सेजल शिंदे यांनीही उल्लेखनीय गुण मिळवत द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. या यशामागे विद्यार्थिनींची जिद्द, परिश्रम आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

## जय आनंद महावीर युवक मंडळाची रौप्य महोत्सवी वाटचाल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नवीपेठ येथील जय आनंद महावीर युवक मंडळाने सामाजिक व सांस्कृतिक कार्याची २५ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण केली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळक यांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या सामाजिक उद्देशाला केंद्रस्थानी ठेवून मंडळाने कार्याचा आदर्श निर्माण केला आहे. जय आनंद युवक मंडळ आणि भगवान महावीर युवक मंडळ यांच्या एकत्रीकरणातून स्थापन झालेल्या या मंडळाने गणेशोत्सव भव्य, प्रबोधनपर आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्याची परंपरा जपली आहे. उत्कृष्ट देखावे, सामाजिक संदेश आणि भाविकांसाठी उत्तम नियोजन यामुळे मंडळाला महानगरपालिकेची पारितोषिकेही मिळाली आहेत. गणेश जयंती, भगवान महावीर जयंती तसेच राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन केले जाते. रक्तदान शिबिरे, नेत्रतपासणी, चित्रकला स्पर्धा, शिक्षक सन्मान, मतदान जनजागृती आदी उपक्रमांमधून मंडळ वर्षभर सामाजिक बांधिलकी जपत आहे. वंचित बालकांना मदत आणि वारकऱ्यांची सेवा यामध्येही मंडळ पुढाकार घेत आहे. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक कार्याची व्याप्ती वाढविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला असून नगरकरांचे सहकार्य भविष्यातही लाभेल, असा विश्वास मंडळाने व्यक्त केला आहे.

## राष्ट्रीय विज्ञान दिन नवजीवन विद्यालय उत्साहात साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव** : शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दि. २८ फेब्रुवारी रोजी 'राष्ट्रीय विज्ञान दिन' साजरा केला. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी भारतीय भौतिकशास्त्रज्ञ सी. व्ही. रामन यांनी ''रामन इफेक्ट''या शोधाची घोषणा केली होती.

ज्यासाठी त्यांना १९३० मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले जीवनात विज्ञानाचे महत्त्व वैज्ञानिक विचारसरणी आणि नवनवीन संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी असलेले विद्यालयाचे पर्यवेक्षक जयराम नांगरे यांनी म्हटले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश खैरे यांनी विद्यालयातील सर्व विज्ञान शिक्षकांचा शाल व पुष्पगुच्छ, पेन देऊन सन्मान केला.




यावेळी डॉक्टर सी व्ही रामन यांच्या विषयी विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केली. पानगव्हाणे सर यांनी विज्ञानाचे महत्त्व आपल्या भाषणातून पटवून दिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता आठवी च्या विद्यार्थिनी श्रुती आगळे व घानमोडे अक्षरा यांनी केले. आभार प्रदर्शन पठाडे श्रुती हिने केले.

## आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीनिमित्त महाआरोग्य शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर** : राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीनिमित्त जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे ४ ते ३० मार्च २०२६ दरम्यान महिनाभर विविध मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रबुद्ध विचारक पूज्य आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत शिबिरे पार पडणार आहेत. एनएबीएच मान्यता प्राप्त व २६० खाटांचे हे रुग्णालय जिल्ह्यातील पहिलेच असून रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विशेष सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत.




एमआरआय (१.५ टेस्ला) २५०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये, सोनोग्राफी ८०० रुपये, डिजिटल एक्स-रे २५० रुपये, तर अँजिओग्राफी ३ हजार रुपयांत उपलब्ध आहे. सवलतीच्या दरात विविध शस्त्रक्रियाही करण्यात येणार आहेत. ४ मार्च रोजी स्त्रीरोग शिबिराने प्रारंभ होणार असून सिझेरियन व अन्य शस्त्रक्रिया १० हजारांच्या पॅकेजमध्ये केल्या जातील. ८ मार्च रोजी कॅन्सर तपासणी शिबिरात मॅमोग्राफी केवळ १०० रुपयांत होईल. १५ मार्च रोजी हृदयरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरात बायपास, अँजिओप्लास्टी प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत केली जाणार आहे. याशिवाय किडनी, मेंदू विकार, त्वचारोग, अस्थिरोग, श्वसनविकार, बालरोग, नेत्ररोग आदी विविध तज्ज्ञ शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत.

२९ मार्च रोजी नेत्रतपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया होणार आहे. या महाआरोग्य उपक्रमांचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन रुग्णालय प्रशासनाने केले आहे.

## लेक सासरी जाताना घोड्यावरून मिरवणूक

### वृक्षारोपणातून नवा आदर्श

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : लग्न समारंभ म्हणजे केवळ परंपरा आणि उत्सव नाही, तर सामाजिक संदेश देण्याचे माध्यमही ठरू शकते, याचा सुंदर प्रत्यय बाबूर्डी (ता. श्रीगोंदा) येथील प्रगतिशील शेतकरी भास्कर बबन शिर्के यांनी दिला. त्यांच्या कन्या हर्षदा हिचा २२ फेब्रुवारी रोजी विवाह संपन्न झाला. सासरी रवाना होताना हर्षदाची घोड्यावरून गावभर मिरवणूक काढून देवदर्शन करण्यात आले आणि तिच्याच हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.



गावातील परंपरेनुसार वधूने सर्व देवतांचे दर्शन घ्यावे, या प्रथेचे पालन करत मिरवणुकीदरम्यान चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर आरती करून अभिवादन करण्यात आले. या उपक्रमामुळे विवाह सोहळ्याला वेगळेच सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व प्राप्त झाले. वृक्षप्रेमी म्हणून ओळख असलेल्या भास्कर शिर्के यांनी यापूर्वीही आईच्या वर्षश्राद्धानिमित्त उपस्थितांना केसर आंब्याची रोपे वाटप केली होती. आज त्या रोपांना अनेकांकडे गोड आंबे लागले आहेत.


वाढदिवस, धार्मिक कार्यक्रम किंवा शालेय उपक्रमांत वृक्ष भेट देणे, शाळांना शालोपयोगी साहित्य पुरवणे, धार्मिक पुस्तके देणे हे त्यांचे आवडीचे उपक्रम आहेत. 'भास्कर भाऊ' म्हणून पंचक्रोशीत परिचित असलेल्या शिर्के कुटुंबाचा शिक्षण आणि समाजकार्याशी घट्ट संबंध आहे. नववधू हर्षदानेही आपल्या पहिल्या पगारातून शाळेच्या इमारत निधीस मदत केली होती. विवाह सोहळ्याचे नियोजन मुलगा प्रतीक शिर्के याने केले. सामाजिक जाणीव आणि परंपरेचा सुंदर संगम घडवणाऱ्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

## सहारा सर्वांगीण विकास संस्थेला कोरो संस्थेच्या समन्वयकांची सदिच्छा भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : सहारा सर्वांगीण विकास संस्थेच्या कार्यकर्त्या पल्लवी सोनवणे, छाया भोसले आणि दत्ता गोसावी यांची कोरो संस्था यांच्या फेलोशिपसाठी निवड झाली आहे. एनटीडीएनटी (भटक्या-विमुक्त) मुद्दे आधारित फेलोशिप छाया भोसले व पल्लवी सोनवणे यांना देण्यात आली असून, ग्रासरूट नेतृत्व विकास करण्यासाठी ही संधी महत्त्वाची मानली जात आहे. या फेलोशिपच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर नेतृत्व निर्माण करणे, समाजातील मूलभूत प्रश्नांवर काम करणे आणि संस्थेचे कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेणे हा उद्देश आहे. या अनुषंगाने संस्थेचे काम पुढे कसे नेले जाईल, संस्थेचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल तसेच संस्थेला येणाऱ्या अडचणी कोणत्या आणि त्यावर उपाययोजना काय असू शकतात यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी कोरो संस्थेच्या मुद्दे आधारित विषयाच्या समन्वयक शिलाताई यादव आणि भावना ताई यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती जाणून घेतली व मार्गदर्शन केले. भेटीदरम्यान उपस्थित महिलांनी पाहुण्यांचे स्वागत 'भटांचा कर्दनकाळ' या महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुस्तकाच्या प्रती देऊन सन्मानपूर्वक केले. या भेटीमुळे संस्थेच्या पुढील वाटचालीस नवी दिशा मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

## संभाजी ब्रिगेड शहराध्यक्षांच्या घरी मध्यरात्री चोरी





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : शहरातील पेडगाव रोड, सावंत वस्ती येथे बुधवार दि. २५ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री अज्ञात चोरट्याने घरफोडी करत तब्बल ९२ हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.सदर घर हे संभाजी ब्रिगेड चे श्रीगोंदा शहराध्यक्ष अभिषेक विठ्ठल सावंत यांचे आहे. घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. श्रीगोंदा शहरातील पेडगाव रोड, सावंत वस्ती येथे अभिषेक सावंत व त्यांचे बंधू विकी छगन सावंत हे गाढ झोपेत असताना चोरट्याने घरात प्रवेश केला.घरातील सामानाची उचकापाचक करत अभिषेक सावंत यांच्या कपाटातील ५७,०००तसेच विकी सावंत यांच्या पेटीतील ३५,०००अशी एकूण ९२,००० रोकड चोरून नेण्यात आली. चोरट्याने घरातील साहित्याची उचकापाचक करून रोकड घेतली आणि घरापासून काही अंतरावर पेटी फोडून पैसे लंपास केल्याचे समोर आले आहे.

हे कुटुंब कष्टकरी असून वस्तीत वाढती असुरक्षितता निर्माण झाली आहे सावंत वस्ती ही डवरी गोसावी समाजाची कष्टकरी वस्ती असून येथील नागरिक मजुरी, छोटे उद्योग व व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. अशा वस्तीत वाढत्या चोऱ्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.याप्रकरणी दि. २७ फेब्रुवारी रोजी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.यावेळी जिल्हाध्यक्ष अरविंद कापसे व जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित होते. गावोगावी कष्टकरी माणसं दिवस काढतात, आणि रात्री चोर मोकाट फिरतात हे चित्र बदलणार कधी? त्यामुळे पोलिसांनी तत्काळ गस्त वाढवून संशयितांची चौकशी सुरू करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

### तालुक्यात चोऱ्यांची मालिका?

श्रीगोंदा तालुक्यात हल्ली मोटारसायकल चोरी, घरफोड्या अशा गुन्ह्यांचे प्रमाण वाढल्याचे नागरिक सांगत आहेत.त्यातच पेडगाव तसेच विविध ठिकाणी चोऱ्यांचे सत्र सुरु झाले असून सदरक्षणाय खलनिग्रहणाय कोठे आहे? चोर कधी शोधणार? किमान आमच्या रोडवर रात्री दोन वेळा पोलीस पेट्रोलिंग व्हावी. असे अभिषेक सावंत यांनी माध्यमांशी बोलताना संतप्त प्रतिक्रिया दिली आहे

## मराठी भाषा आपली संस्कृती व अस्मिता : आल्हाट



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ढोरजळगाव** : मराठीभाषेला सुमारे दोन हजार वर्षांचा प्राचीन आणि समृद्ध इतिहास लाभला आहे ज्ञानेश्वरांच्या भावार्थ दीपिके पासून ते तुकारामांच्या अभंगापर्यंत आणि शिवरायांच्या पराक्रमापासून ते कुसुमाग्रजांच्या कवितांपर्यंत आपली मायबोली मराठी नटलेली असून मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ती आपली संस्कृती आणि अस्मिता आहे.आजच्या डिजिटल युगात आपण मराठी भाषा टिकवणे आणि वाढवणे गरजेचे आहे.आपण केवळ या दिवशीच नाही, तर कायमस्वरूपी मराठीचा अभिमानाने वापर केला पाहिजे.घरी व शाळेत मराठीत बोलणे, मराठी पुस्तके वाचणे हे छोटे संकल्पही भाषेच्या संवर्धनासाठी मोठे ठरतील असे मत जेष्ठ शिक्षक सुधाकर आल्हाट यांनी बोलताना व्यक्त केले. कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या श्रीराम माध्य व उच्च माध्य विद्यालय ढोरजळगाव येथे मराठी साहित्यातील महान साहित्यिक, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी 'कुसुमाग्रज' यांचा जन्मदिन मराठी भाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी आल्हाट बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते ग्रामदैवत प्रभू श्रीराम,कर्मयोगी आबासाहेब काकडे व कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून विद्यालयातील मराठी विषय शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. विद्यालयातील शिक्षिका श्रीम. रत्नमाला फलके यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यामागची पार्श्वभूमी व कवी कसुमाग्रजांचे साहित्यिक कार्य विद्यार्थ्यांसमोर मांडून कुसुमाग्रज यांच्या कणा कवितेचे सादरीकरण केले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे,पर्यवेक्षिका सुरेखा शेलार, शंकर खोले,सुरेश तेलोरे , राम काटे,अशोक जाधव,पांडुरंग व्यवहारे, कल्याण राऊत,श्रीमती माधुरी जाधव यांचेसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धांत खाडे यांनी केले व कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रबोध पाटेकर यांनी केले तर शुभम फुलमाळी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## देव नामाची कास धरल्यास आयुष्य पवित्र होते : हभप चंद्रकांत महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर** : श्रीसंत तुकाराम महाराज बिजोत्सवा निमित्त पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील अखंड हरीनाम साप्ताहास ५० वर्ष पूर्ण झाल्यामुळे, सुवर्ण महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

भव्य कीर्तन सोहळ्यातील चौथ्या दिवसाचे कीर्तनपुष्प हभप चंद्रकांत महाराज वांजळे यांनी गुंफले. यावेळी हभप चंद्रकांत महाराज वांजळे यांनी पवित्र होईन चरित्र उच्चारे । रूपाच्या आधारे गोजिरिया ।।१।। आपुरती बुद्धि पुण्य नाही गाठी । पायी घाली मिठी पाहे डोळा ।। या संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर सविस्तर निरूपण केलें. यावेळी बोलताना महाराज म्हणाले, आत्म्याचा विचार करणारी बुद्धी हिताची असून, परबुद्धी विनाशकरी असते.

अज्ञानी माणसाला समजावता येते अडव्या बुद्धीला काय समजावणार..देवाच्या भजन चिंतानात आयुष्य घालवीने गरजेचे आहें.यावेळी बरे झाले विठोबा तू आमच्या गावाला आला हे चरण सादर केलें. स्वतः ला 'अज्ञानी' मानून, देवाच्या रूपाची आणि नामाची कास धरल्यास आयुष्य पवित्र होते, नामस्मरणाने आयुष्य पवित्र होते. सदर किर्तन श्रवणासाठी मोठ्या संख्येने भाविकभक्त उपस्थित होते.



# पुरंदर विमानतळासाठी ६,००० कोटींचा निधी मंजूर

## भूसंपादनाचा मार्ग मोकळा, राज्य सरकारची मोठी घोषणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** पुणे जिल्ह्याच्या आणि राज्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाने आता एक मोठा टप्पा ओलांडला आहे. या विमानतळासाठी आवश्यक असलेल्या जमीन संपादनाकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (MIDC) ६,००० कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यास राज्य शासनाने अधिकृत मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे गेल्या अनेक दिवसांपासून निधीअभावी रखडलेली भूसंपादन प्रक्रिया आता वेग घेणार आहे.



**शासन निर्णय आणि निधीची तरतूद :**

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने २७ फेब्रुवारी २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय (GR) निर्गमित केला. १० फेब्रुवारी रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रस्तावावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. विमानतळासाठी जमिनीचा ताबा घेण्यासाठी मोठ्या निधीची गरज होती. हा निधी उभारण्यासाठी एमआयडीसीला 'हुडको' (HUDCO) किंवा अन्य वित्तीय संस्थांकडून स्पर्धात्मक व्याजदराने कर्ज घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या कर्जासाठी राज्य सरकारने स्वतः ची 'शासन हमी' (Govenment Guaantee) दिली आहे.

**कर्ज परतफेडीचे 'भागीदारी' सूत्र :**

विमानतळ उभारणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या 'विशेष हेतू प्राधिकरणातील' (SPV) सर्व भागीदार संस्थांवर कर्ज परतफेडीची जबाबदारी त्यांच्या हिश्शानुसार विभागली गेली आहे. यामध्ये: सिडको (CIDCO): ५१% हिस्सा महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (MADC): १९% हिस्सा एमआयडीसी (MADC) १५% हिस्सा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (PMRDA): १५% हिस्साया चारही संस्था त्यांच्या मालकीच्या प्रमाणानुसार कर्जाच्या व्याजाचा आणि मुद्दलाचा भार उचलणार आहेत.

**पुण्याच्या विकासाला मिळणार 'बूस्टर' :**

पुरंदर विमानतळ प्रकल्प मार्गी लागल्यास पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातील दळणवळण, उद्योग आणि लॉजिस्टिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. ६,००० कोटी रुपयांच्या या निधीमुळे आता प्रत्यक्ष जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याचा मार्ग मोकळा झाला असून, प्रशासकीय स्तरावर हालचालींना वेग आला आहे.

**पारदर्शकतेसाठी कडक अटी**

राज्य सरकारने ही मान्यता देताना काही महत्त्वाच्या अटी व शर्ती लागू केल्या आहेत :

१. वित्तीय शिस्त: कर्ज उभारताना आणि खर्च करताना 'एफआरबीएम' (FRBM) कायद्यातील तरतुदींचे काटेकोर पालन करावे लागेल.

२. **व्याजदर नियंत्रण:** एमआयडीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या समन्वयाने सर्वात कमी व्याजदर निश्चित करावा.

३. **वेळेचे बंधन:** ज्या कामासाठी (भूसंपादन) कर्ज घेतले आहे, त्याच कामासाठी तो निधी विहित कालावधीत खर्च करणे बंधनकारक असेल.

४. **नियमित अहवाल:** कर्जाची परतफेड आणि आर्थिक स्थितीबाबतचा अहवाल दरमहा किंवा सहामाहीत शासनाला सादर करावा लागेल.

# लांडेवाडी येथे भीषण अपघात

## दुचाकीस्वाराचा मृत्यू, दोन वर्षीय बालक जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील लांडेवाडी येथे शुक्रवारी दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी झालेल्या भीषण अपघातात किशोर बाबाजी हुले वय ३२ राहणार लांडेवाडी पिंगळवाडी तालुका आंबेगाव या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला असून त्याचे समवेत असलेले दोन वर्षांचे बालक जखमी झाले आहे. या प्रकरणी मंचर पोलीस स्टेशन येथे सुरज बाळासाहेब हुले यांनी फिर्याद दाखल केली असून अपघातास कारणीभूत ठरलेला पीक अप चालक अ**लिंडेवाडी येथे भीषण अपघात दुचाकीस्वाराचा मृत्यू, दोन वर्षीय बालक जखमी** नकेत दिनकर साबळे वय,२८ राहणार लांडेवाडी तालुका आंबेगाव याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या बाबत पोलीसांनी दिलेली माहिती अशी की, दि. २७ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे १२:३० वाजण्याच्या सुमारास मंचर ते भिमाशंकर मार्गावरील लांडेवाडी हद्दीत इंडियन ऑईल पेट्रोलपंपाजवळ हा अपघात घडला. आरोपी अनिकेत दिनकर साबळे हा आपल्या ताब्यातील पिकअप गाडी (क्रमांक एम एच १६ ए ई २९९१) मंचरकडून घोडेगावकडे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवत होता. त्यावेळी घोडेगावकडून मंचरकडे येणाऱ्या पल्सर दुचाकीला (एम एच १४ जे क्यू ५४७९) त्याने जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील किशोर बाबाजी हुले (वय ३२, रा. लांडेवाडी पिंगळवाडी ता. आंबेगाव) यांचा मृत्यू झाला. तसेच त्यांच्या दोन वर्षीय मुलगा अगस्त्य किशोर हुले याला किरकोळ दुखापत झाली असून दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या प्रकरणी फिर्यादीनुसार मंचर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहायक फौजदार डावखर करीत आहेत. या घटनेमुळे लांडेवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.


# आंबेगाव तालुक्यातील नागापूर गावात तिसरा बिबट्या जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** नागापूर तालुका आंबेगाव गावातील पवार मळा परिसरात शुक्रवारी दिनांक २७ तिसरा बिबट्या जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. महीना भरात हा तिसरा बिबट्या जेरबंद झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांनी सुटकेचा निस्वास सोडला आहे. नागपूर गावातील प्रसिद्ध देवस्थान थापलिंग देवस्थानाच्या पश्चिमेला पवार मळ्यात वनविभागाने तीन पिंजरे लावले होते पैकी १३ फेब्रुवारीला मादी जेरबंद झाली. त्यानंतर २५ फेब्रुवारीला बछडा जेरबंद झाला. त्यानंतर पुन्हा शुक्रवारी मध्यरात्रीच्या दरम्यान बिबट मादी जेरबंद झाली. नागापूर गावचे पोलीस पाटील संजय पोहकर यांनी वनविभागाला ही माहिती दिली.

मंचर विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिमंडल अधिकारी फुलमाळी वनरक्षक बालाजी पोत्रे यांनी मादीला सुखरूपरीत्या ताब्यात घेऊन जुन्नर तालुक्यातील माणिकडोह निवारा केंद्रात हलविण्यात आले आहे. सलग तीन बिबटे जेरबंद झाल्याने नागापूर परिसरातील शेतकऱ्यांसह नागरिकांनी सुटकेचा निस्वास सोडला आहे.

सलग तीन बिबटे जेरबंद झाल्याने नागापूर परिसरातील शेतकरी, मेंढपाळ तसेच नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. मागील काही दिवसांपासून जनावरांवर हल्ल्यांच्या घटना व बिबट्यांच्या हालचालीमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र वनविभागाच्या तातडीच्या कारवाईमुळे परिस्थिती नियंत्रणात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. दरम्यान, वनविभागाकडून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले असून रात्रीच्या वेळी शेतात एकटे न जाणे, लहान मुलांना घराबाहेर एकटे न सोडणे तसेच जनावरे सुरक्षित बांधून ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.



# बारामती नगर परिषद अर्थसंकल्पवेळी सभेत नगरसेवक आक्रमक

## नगरसेवकांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाईची नगराध्यक्षांची सूचना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती प्रतिनिधी :** बारामती नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये बारामती नगरपरिषद सन २०२५-२६ चा सुधारित व सन २०२६-२७ चा मूळ अर्थसंकल्प (ता.२६) रोजी सादर करण्यात आला. सदर अर्थसंकल्पामध्ये बारामती शहराच्या पायाभूत सुविधा, नागरी सुविधा, पर्यावरण विकास, आरोग्य व स्वच्छता, सामाजिक सुविधा याकरिता भरीव तरतूद करून आर्थिक शिस्त व पारदर्शकता, सर्वसमावेशक कल्याण व शाश्वत विकासाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.




अर्थसंकल्पामध्ये बारामती शहराच्या पायाभूत सुविधा, नागरी सुविधा, पर्यावरण विकास, आरोग्य व स्वच्छता, सामाजिक सुविधा याकरिता भरीव तरतूद करून आर्थिक शिस्त व पारदर्शकता, सर्वसमावेशक कल्याण व शाश्वत विकासाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

नगरपालिकेचे जेसीबी तीन महिन्यापासून बंद अवस्थेत आहेत. ते दुरुस्त न करता दुसरीकडून जेसीबी भाडेतत्वावर घेतले जातात आणि त्याला महिन्याला अंदाजे दहा लाख रुपये भाडे देतात. बारामती नगर परिषदेचे जेसीबी असताना भाडेतत्त्वावर घेण्याची गरज का..? भाडेतत्त्वावर जेसीबी घेऊन याचा मलिदा कोण खातोय असा मुद्दा अभिजीत जाधव यांनी उपस्थित केला. नगरसेवक प्रशिक्षणासाठी २० लाखाची तरतूद असून देखील त्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत नसल्याचा मुद्दा उपगटनेते संपदा चौधर यांनी उपस्थित केला. मालमत्ता कर आकारणी चुकीच्या पद्धतीने आकारणी जात असल्याचे मुद्दा जय पाटील यांनी उपस्थित केला आमराई परिसरातील नागरिकांना विहिरीतून पाणी दिले जात असताना देखील पाणीपट्टी आकारली जात असल्याचा मुद्दा नवनाथ बल्लाळ यांनी उपस्थित उपस्थित केला. नगरपालिकेच्या गाळ्यांवरील कर आकारणीचा मुद्दा निलेश इंगुले यांनी उपस्थित केला.

या प्रसंगी नगराध्यक्ष सचिन सातव, मुख्याधिकारी पंकज भुसे, उपनगराध्यक्ष श्वेता नाळे, गटनेते संजय संगवी, उपगटनेते संपदा चौधर, आरोग्य सभापती, बांधकाम सभापती तसेच सर्व नगरसेवक नगरसेविका उपस्थित होते. तर नगरसेवक अभिजीत जाधव, नवनाथ बल्लाळ, सुनील सस्ते, विष्णूपंत चौधर, जय पाटील, नीलेश इंगुले, अभिजित चव्हाण, अमर धुमाळ, भारती शेळके, सोमनाथ गजाकस, राहुल वाघोलीकर, आलताफ सय्यद, राजेंद्र सोनवणे, प्रतिभा खरात, संपदा चौधर, आरती गव्हाळे शेंडगे,अनुप्रिता ताबे, दर्शना तांबे, सविता जाधव, मनीषा बनकर, गणेश जोजारे, अमोल कावळे, गोरख पारसे, विशाल हिंगणे यांनी प्रशासनाला विविध विषयांवर जाब विचारला.

# सासवड नगरपरिषदेकडून ३९२ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** सासवड नगरपरिषदेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा सुमारे ३९२ कोटी ६५ लाख रुपयांचा अर्थसंकल्प सर्वानुमते मंजूर करण्यात आला. २७ फेब्रुवारी रोजी नगरपरिषद सभागृहात झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत हा अर्थसंकल्प खेळीमेळीच्या वातावरणात मंजूर करण्यात आला.

सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष आनंद चंद्रकांत जगताप होत्या. सन २०२६-२७ साठी कोणतीही करवाढ न करता अर्थसंकल्प मंजूर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली.

अर्थसंकल्पानुसार अंदाजे महसुली जमा रक्कम ४० कोटी ४३ लाख ७४ हजार ३९४ रुपये तर भांडवली जमा ३५१ कोटी २४ लाख ६७ हजार १८१ रुपये अशी एकूण जमा रक्कम ४२६ कोटी १४ लाख ९२ हजार ४०६ रुपये अपेक्षित आहे. तसेच महसुली खर्च ३८ कोटी ८८ लाख ७० हजार ३०७ रुपये व भांडवली खर्च ३५३ कोटी ७६ लाख ७७ हजार १८१ रुपये असा एकूण खर्च ३९२ कोटी ६५ लाख ४७ हजार ४८८ रुपये अपेक्षित धरण्यात आला आहे.



यावर्षी नविन पाणीपुरवठा योजना, नवे उद्यान, भुयारी गटार टप्पा २, 'माझी वसुंधरा' यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. तसेच शासन नियमानुसार दिव्यांग निधी, महिला व बालकल्याण निधी आणि आर्थिक दुर्बल घटकांसाठी ५ टक्के तरतूद करण्यात आली आहे.

सभेत नगराध्यक्षांसह सर्व नगरसेवक-नगरसेविका, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण तसेच विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते. सभेच्या शेवटी नगराध्यक्षांनी अर्थसंकल्पाचे स्वागत करत सर्वांचे आभार मानले.

# महिला नर्सवर जीवघेणा हल्ला

## विनयभंग व कुटुंबीयांना मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरातील सहारा पार्क परिसरात ड्युटीवरून घरी परतणाऱ्या एका २२ वर्षीय महिला परिचारिकेचा विनयभंग करून तिला व तिच्या कुटुंबीयांना बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना २७ फेब्रुवारी रोजी रात्री घडली. या प्रकरणी वैजापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी शहरातील एका खासगी रुग्णालयात नर्स म्हणून कार्यरत असून रात्री साडेनऊच्या सुमारास स्कुटीवरून घरी परतत असताना शेजारी राहणाऱ्या बंटी इंद्रसेन भोसले याने तिची वाट अडवली. त्याने अश्लील शिवीगाळ करत चारित्र्यावर शिंतोडे उडवले. फिर्यादीने त्याला निघून जाण्यास सांगितल्यावर आरोपीने संतापून तिला जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केली व तिचा विनयभंग केल्याचा आरोप आहे.


पीडितेच्या आरडाओरडीनंतर तिचे वडील, भाऊ व बहीण बाहेर आले असता आरोपीच्या वडिलांसह अन्य साथीदारांनी त्यांनाही मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच एका तरुणाने चाकूने ठार मारण्याची धमकी दिल्याचेही सांगण्यात आले. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून महिलांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी संबंधितांविरुद्ध विनयभंग, मारहाण व धमकी दिल्याप्रकरणी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# भीमाशंकर कारखान्याच्या गळीत हंगामाची सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** दत्तात्रयनगर पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने सन २०२५-२६ गाळप हंगामामध्ये ८ लाख ८३ हजार ६९ मे.टन ऊस गाळप करून ९ लाख २७ हजार १९७ साखर पोत्यांचे उत्पादन करून यशस्वी हंगामाची सांगता करण्यात आली. हंगाम यशस्वी करण्यासाठी सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे यांनी आभार व्यक्त केले.

चेअरमन बेंडे म्हणाले की, कारखान्याचे संस्थापक संचालक माजी मंत्री आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व संचालक मंडळाच्या सहकार्याने तसेच अधिकारी व कर्मचा-याच्या नियोजनाने गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये कार्यक्षेत्र व परिसरातून नोंद असलेल्या संपूर्ण उसाचे गाळप करून ८ लाख ८३ हजार ६९ मे.टन ऊस गाळप करुन ९ लाख २७ हजार १९७ साखर पोत्यांचे उत्पादन केले असून गाळप हंगाम यशस्वीरित्या पूर्ण केला आहे.




हंगाम यशस्वी करण्यासाठी योगदान देणारे ऊस तोडणी वाहतुक कंत्राटदार आणि मजूर यांचा कारखान्याच्या वतीने सत्कार करण्यात आला.

कारखान्याने सन २०२५-२६ गाळप हंगामात १५ फेब्रुवारी अखेर गाळप केलेल्या ऊसासाठी ऊस उत्पादक शेतक-यांना एफ.आर.पी. प्रमाणे रु. ३,२७३ प्रती टनाप्रमाणे रुपये २८० कोटी अदा केले आहेत. भीमाशंकर कारखान्यामार्फत दत्तात्रय वळसे पाटील ऊस उत्पादकता वाढ लक्ष २०२० हि महत्वकांक्षी योजना वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी बु. यांचे मार्गदर्शनाखाली राबवीत असून योजनेअंतर्गत ऊस उत्पादक शेतक-यांना प्रशिक्षण, माती व पाणी परीक्षण सुविधा, उधारीवर ताग व ऊस बेणे वाटप, ऊस रोपवाटिका, खाजगी ऊस लागवड व ठिबक सिंचन अर्थसहाय्य, उधारीवर द्रवरूप जीवाणू खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैव संजीवक, ह्युमिक ॲसिड, जैविक किड नियंत्रण, इपीएन, रासायनिक खते व औषधे, पाचट कुट्टी इ. पुरवठा केला जातो. उधारीवर व कमी खर्चामध्ये ड्रोन फवारणीची सुविधा तसेच स्वंतत्र ऊस विकास विभागाची स्थापना करून ऊस उत्पादक शेतक-यांना कर्मचा-यामार्फत ऊस पिकाबाबत अद्यावत माहिती व तंत्रज्ञान उपलब्ध करून दिले जाते.

तरी ऊस उत्पादक शेतक-यांनी योजनेतील सुविधांचा लाभ घेवून ऊस लागवडीवर व उत्पादन वाढीवर भर द्यावा असे आवाहन केले. सभासद व ऊस उत्पादक शेतक-यांना दिल्या जाणा-या अधुनिक सोईसुविधा व सतत वेळेवर दिलेल्या योग्य दरामुळे कारखान्याने मिळविलेल्या विश्वासाच्या जोरावर यशस्वी वाटचाल सुरु आहे असे कारखान्याचे चेअरमन बेंडे यांनी सांगितले.

# मंचर बस स्थानकावर सोने चोरी करणारी टोळी जेरबंद

## मंचर पोलिसांची कारवाई ; २४ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** मंचर बस स्थानक परिसरात मागील काही दिवसांपासून प्रवाशांच्या बॅगा व दागिन्यांची चोरी करणारी टोळी अखेर मंचर पोलिसांच्या जाळ्यात अडकली आहे. या प्रकरणात दोन महिला व एका पुरुषाला अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, मंचर बस स्थानकावर प्रवाशांचे पैसे व महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरीस जाण्याच्या घटना वाढल्या होत्या. या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली मंचर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी विशेष पथक तयार केले होते. दरम्यान, पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, लातूर व धाराशिव जिल्ह्यातील दोन महिला आणि एक पुरुष नारायणगावकडून पुण्याकडे चारचाकी वाहनाने येत आहेत. या माहितीच्या आधारे मंचर पोलिसांनी नारायणगाव – भोरवाडी फाटा परिसरात सापळा रचला. संशयित वाहन थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये दोन महिला व एक पुरुष आढळून आले. चौकशीदरम्यान त्यांनी आपली नावे बेबीनंदा इंद्रजीत कसबे, स्वाती उमाकांत तपसाळे, शिवाजी सुभाष घोलप अशी सांगितली.

सखोल चौकशी केल्यानंतर त्यांनी १०/९/२०२५ व १५/९/२०२६ रोजी मंचर बस स्थानक परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दोन गंठण गर्दीचा फायदा घेत चोरी केल्याची कबुली दिली. या कारवाईत पोलिसांनी २४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेले चारचाकी वाहन असा एकूण सुमारे २,४४,९८० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक संदीप गिल्ल, अपर पोलिस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्रीकांत कंकाळ, सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील बडगुजर, पोलिस हवालदार संजय नाडेकर, शेखर भोंडवे, सुनील मोरे तसेच पोलिस कर्मचारी यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

दखल

# सासवडच्या एसटी आगाराने साजरा केला ''मराठी भाषा दिन

**माळशिरस :** कविवर्य विष्णू वामन शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणुन साजरा करण्यात येत असतो त्या निमित्ताने येथील राज्य परिवहन महामंडळाच्या सासवड आगारात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ग्राहक मंच पुणे जिल्हाध्यक्ष शिवाजी सुकळे या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण



करून व दीप प्रज्वलन करत कार्यक्रमाची सुरुवात झाली. वाहतूक नियंत्रक पोपट जैनक यांनी मराठी भाषा आपली मातृभाषा असुन तिचा स्वाभिमान व अभिमान उंचीवर नेण्यासाठी कायम आग्रही राहिले पाहिजे असे आवाहन केले . वाहतूक नियंत्रक मनिषा भोईटे यांनी'' कणा'' ही कविता सादर करत उपस्थितांच्या टाळ्या घेतल्या. वाहतूक निरीक्षक सुनील येळे यांनी सर्वांचे स्वागत करून आभार व्यक्त केले. सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक दत्तात्रय मदने वाहतूक नियंत्रक कैलास जगताप, कामगार संघटनेचे गणेश भुजबळ यांसह लक्ष्मी गायकवाड, रुपाली गिरमेप्रवीण गायकवाड, रामचंद्र गावडे, प्रतीक्षा यादव, अमित वाल्मिकी, ज्योत्स्ना कवळे या कर्मचाऱ्यांसह काही प्रवाशी बांधव या प्रसंगी उपस्थित होते.

# व्यापारी गाळ्यांवर बारामती नगरपरिषदेची कारवाई

**बारामती :** नगर परिषद मार्फत रूई परिसरातील ओढ्याच्या पात्रात भराव करून अनधिकृतपणे उभारण्यात आलेल्या चार व्यापारी गाळ्यांवर (दि:२८) रोजी निष्कासन कारवाई करण्यात आली. ओढ्याच्या नैसर्गिक प्रवाहात अडथळा निर्माण होऊन पूरस्थितीचा धोका वाढू नये तसेच सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात आल्याचे नगरपरिषदेच्या प्रशासनाकडून सांगण्यात आले.



सदर गाळे हे नियमबाह्य पद्धतीने बांधकाम करून उभारण्यात आले असल्याचे तपासात स्पष्ट झाल्यानंतर संबंधितांवर कारवाईचा निर्णय घेण्यात आला. बारामती नगरपरिषद पथकाने घटनास्थळी पोहोचून यंत्रसामग्रीच्या सहाय्याने अनधिकृत बांधकाम हटवले.कारवाई दरम्यान परिसरात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेकडून सर्व नागरिकांना सूचित करण्यात आले आहे की, ओढे, नाले, सार्वजनिक जागा किंवा आरक्षित क्षेत्रांमध्ये कोणतेही अनधिकृत बांधकाम अथवा भराव केल्यास त्यावर पुढील काळातही कडक कारवाई करण्यात येईल. नियमांचे पालन करूनच बांधकाम करावे, अन्यथा अशा प्रकारच्या निष्कासन मोहिमा सुरूच राहतील, असा इशारा बारामती नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दिला आहे.

# भोकरवस्ती जिल्हा परिषद शाळेत बालआनंद मेळावा

**वळती( ता. आंबेगाव ) :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोकरवस्ती बाल आनंद मेळावा शनिवार ( दि. २७ ) रोजी उत्साहात संपन्न झाल्याची माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका स्नेहल लोखडे व बाळासाहेब इदोरे यांनी दिली शाळेत आयोजित बाल आनंद मेळावा विद्यार्थ्यांनी बनवलेल्या चविष्ट खाद्यपदार्थांच्या स्टॉलमुळे एकच गर्दी झाल्याचे पहावयास मिळाले . या कार्यक्रमात मुलांमध्ये व्यावहारिक ज्ञान, व्यवहार कौशल्ये, नेतृत्व आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ ठरला, जिथे त्यांनी खरेदी-विक्रीचा अनुभव घेतल्याने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधतात यावेळी विद्यार्थ्यांनी चविष्ट खाद्यपदार्थांच्या स्टॉल व फळे पालेभाज्या स्टॉल लावले होते. या मेळाव्यात पाच हजाराची उलाढाल झाली या मेळाव्यात पालकांसह परिसरातील नागरिकांनी हजेरी लावत मुलांचे प्रोत्साहन वाढवले.या वेळी जिल्हा परिषद सदस्य प्रीती थोरात, पंचायत समिती सदस्य प्रियंका वाघ, सरपंच आनंद वाव्हळ, उपसरपंच तेजस भोर, ग्रामपंचायत सदस्या अमृता भोर,केतन वाघ,रभाजी भोर, नाना जाधव,बाबाजी भोर, सतोष शिंदे, रवींद्र शिंदे, निलेश भोर, सचिन भोर,ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते विद्यार्थिनी विविध प्रकारचे फळे पालेभाज्या फळभाज्या संतुलित आहार तसेच विविध प्रकारचे खाद्यपदार्थ विक्रीस ठेवल.



द • ख • ल

## पोस्टल असोसिएशनची कार्यकारणी जाहीर

**नगर** : ऑल इंडिया पोस्टल एस सी एस टी वेल्फेअर असोसिएशनचे तिसरे अधिवेशन अहिल्यानगर येथे संपन्न झाले.या अधिवेशनामध्ये पुढील दोन वर्षाकरिता कार्यकारणीची निवड करण्यात आली.दीपक यशवंत नागपुरे यांची अध्यक्षपदी तर विजय चाबुकस्वार यांची सेक्रेटरी पदी नियुक्ती सर्वानुमते करण्यात आली. इतर कार्यकारणी पुढील प्रमाणे कार्यकारी अध्यक्षपदी अश्विनी चिंतामणी,किरण शिंदे,प्रदीप सूर्यवंशी व दीपक कुंभारे,डेप्युटी सेक्रेटरी अमोल साबळे, खजिनदार महेश सदाफुले,असिस्टंट सेक्रेटरी हर्ष कांबळे,भावना कदम व पूजा सिन्नरकर,ज्योती कांबळे ऑर्गनायझेशन सेक्रेटरी,सीमा साळवे असिस्टंट सेक्रेटरी,सुभाष बर्डे,सुरज खंडागळे,बाबासाहेब शितोळे,अजय आगळे,सारिका साळवे,जय मडावी,अर्जुन जटाळे , दीपक भुसारी,संदीप मिसाळ, शैलेश राहींज,अश्विनी फुलकर,राहुल साबळे यांची सर्वांची सर्वानुमते कार्यकारणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

## एम्प्लॉईज सोसायटी कर्मचाऱ्यांना मोफत उपचार द्यावेत : मागणी



**अहिल्यानगर** : साईबाबा संस्थानच्या आवारात भक्तांसाठी कार्यरत असलेल्या एम्प्लॉईज क्रेडिट सोसायटीच्या कर्मचाऱ्यांना संस्थानच्या रुग्णालयात मोफत वैद्यकीय सुविधा द्याव्यात, अशी मागणी सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट चे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांना निवेदन दिले.

संस्थान परिसरात मोबाईल-कॅमेरा क्लोकरूम, चप्पल स्टँड, प्रसादालय व विविध स्टॉल्स रात्रंदिवस सुरू असतात. या स्टॉल्सवर कार्यरत कर्मचारी अल्प मानधनावर सेवा बजावत असून त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना साईनाथ व साईबाबा रुग्णालयात मोफत उपचारांची सुविधा नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. एखाद्या गंभीर आजाराच्या वेळी खासगी रुग्णालयातील खर्च पेलणे अशक्य होत असल्याने अनेकांना कर्ज काढावे लागते, अशी व्यथा व्यक्त करण्यात आली.

पवार यांनी सांगितले की, हे कर्मचारी देश-विदेशातून येणाऱ्या हजारो भक्तांची सेवा करत असतात. त्यामुळे त्यांना माणुसकीच्या नात्याने वैद्यकीय कवच देणे आवश्यक आहे. संचालक रामा गागरे, सचिव विलास वाणी आणि जनसंपर्क अधिकारी दीपक लोखंडे यावेळी उपस्थित होते.

## श्री नागेश विद्यालयाचा 'एनएमएमएस' परीक्षेत डंका; ९६ पैकी ८० विद्यार्थी उत्तीर्ण




**जामखेड** : रयत शिक्षण संस्था संचलित श्री नागेश विद्यालय, जामखेड येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षा (सन २०२५२६) मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. परीक्षेस बसलेल्या ९६ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा एकूण निकाल ८३.३३ टक्के लागला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरली आहे.

विद्यालयातील आयुष अविनाश बोधले व संचित संतोष खैरे या दोन्ही विद्यार्थ्यांनी प्रत्येकी १४९ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. द्वितीय क्रमांक भोंडवे यश महादेव (१४७ गुण), तृतीय क्रमांक वराट यशराज शहादेव (१४५ गुण) तर चौथा क्रमांक भवर यशराज शंकर (१४४ गुण) यांनी मिळविला. तसेच जाधव ओम, वटाणे ओंकार, माळी कृष्णा, धुमाळ सोहम, पवार अथर्व, तिवारी करण, जगताप अनिश आणि रेळेकर श्रेयश यांसह १३ विद्यार्थ्यांनी १२० पेक्षा अधिक गुण मिळवून विशेष प्राविण्य संपादन केले. एकूण ३३ विद्यार्थ्यांनी १०० हून अधिक गुण मिळवले आहेत.या यशामागे शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. बुद्धिमत्ता विभाग प्रमुख देशमुख एस.एस., विज्ञान विषयाचे मडके बी.के. व पठाण ए.एन., सामाजिक शास्त्राचे लटपटे डी.व्ही. तसेच गणित विषयाचे चौधरे ए.बी. यांनी विद्यार्थ्यांना परिश्रमपूर्वक मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक मडके बी.के., पर्यवेक्षक जाधवर एस.व्ही., स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राजेंद्र कोठारी, हरिभाऊ बेलेकर, विनायक राऊत तसेच शाळा व्यवस्थापन समितीने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. जामखेड परिसरातून यशस्वी विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# संघ भावनेने खेळल्यास विजय निश्चित : अक्षय कर्डिले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**करंजी** : क्रिकेट असो की कोणताही खेळ असो खेळामध्ये संघ भावना ही फार महत्त्वाची असते. सांघीक खेळामध्ये संघ भावनेने खेळल्यास विजय निश्चित होतो असे प्रतिपादन भाजपाचे युवा जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी केले. देवराई ता. पाथर्डी येथे देवराई प्रीमियर लीगचे या क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन कर्डिले यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. मिर्झा मण्यार ,कुशल भापसे, पुरुषोत्तम आठरे, सरपंच अक्षय पालवे उपस्थित होते.

यावेळी बोलताना कर्डिले म्हणाले की जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी जिद्द आणि चिकाटीला फार महत्व आहे.खेळामध्येही तसेच आहे संघ भावना आणि खिलाडूवृत्ती असल्यास आपला विजय निश्चित होताना व आपण केलेल्या प्रयत्नाला यश येते आणि म्हणून खेळाडूंनी खेळ खेळत असताना संघ भावना जपावी. आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी कुस्तीलाच नावे तर प्रत्येक खेळाला आणि खेळाडूंना प्रोत्साहन देत गावोगावी खेळाच्या किट व साहित्य देण्याचे काम केले. आगामी काळातही त्यांचा हा वारसा आपण पुढे चालू ठेवणार असून कोणत्याही गावाला विकास कामाच्या बाबतीत निधी कमी पडू देणार नसल्याचे सांगितले.

यावेळी कुशल कापसे यांनी खेळाप्रती आपल्या भावना व्यक्त करत परिसरामध्ये सहा क्रिकेट स्पर्धेच्या आयोजन करत अनेक स्पर्धा भरवल्या असून खेळाला प्रोत्साहन देण्याचे काम सुरूच ठेवणार असल्याचे सांगितले.यावेळी राहुल कारखेले, मिर्झा मण्यार, एकनाथ आटकर, बंडु पाठक, नवनाथ आरोळे,गणेश पालवे,उपस्थित होते. विजय कारखेले यांनी सूत्रसंचालन केले.

# बालविवाह मुक्त पारनेरसाठी अण्णा हजारे यांचे स्नेहालयच्या 'उडान' प्रकल्पाला पाठबळ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पारनेर** : बालविवाह ही समाजाला लागलेली मोठी कीड असून, ती मुळापासून उपटून टाकण्यासाठी लोकचळवळ उभारणे गरजेचे आहे. पारनेर तालुक्यात स्नेहालय संस्था अहिल्यानगर यांच्या वतीने राबविण्यात येत असलेले 'बालविवाह मुक्त तालुका' अभियान कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णासाहेब हजारे यांनी केले.

राळेगण सिद्धी येथे स्नेहालय संस्थेच्या 'उडान' प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या समुपदेशकांनी अण्णासाहेब हजारे यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी त्यांनी पारनेर तालुक्यात सुरू असलेल्या सामाजिक कार्याचा आढावा अण्णांसमोर मांडला.

स्नेहालय संस्थेच्या वतीने बालविवाह प्रतिबंधासाठी 'उडान' हा विशेष प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून केवळ लग्न रोखणे एवढाच मर्यादित उद्देश नसून, त्या मुलींच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. भेटीदरम्यान उडान प्रकल्पाच्या समुपदेशक निशा वाघ आणि पत्रकार भगवान गायकवाड यांनी या अभियानाची सखोल माहिती दिली. या मोहिमेचे मुख्य पाच स्तंभ खालीलप्रमाणे आहेत.

ग्रामीण भागात बालविवाहाचे दुष्परिणाम समजावून सांगणे. कायद्याच्या मदतीने आणि समुपदेशनाने बालविवाह रोखणे. पीडित किंवा जोखीमग्रस्त मुलींच्या शिक्षणाची खंडित न होता सोय करणे.मुलींच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांना सुरक्षित वातावरण देणे.मुलींना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन पायावर उभे करणे.यावेळी अण्णा हजारे यांनी संस्थेच्या कामाचे कौतुक करताना सांगितले की, मुलींचे शिक्षण आणि स्वावलंबन हाच ग्राम विकासाचा खरा पाया आहे. बालविवाहामुळे एका मुलीचे आयुष्यच नव्हे, तर पुढची पिढीही अंधारात ढकलली जाते. स्नेहालय करत असलेले हे कार्य राष्ट्रनिर्मितीचे कार्य आहे. त्यांनी या मोहिमेला आपले पूर्ण सहकार्य आणि शुभाशीर्वाद दिले.

यावेळी पारनेर तालुक्यातील बालविवाहाची सद्यस्थिती आणि प्रशासकीय पातळीवर मिळणारे सहकार्य यावरही चर्चा करण्यात आली. समाजाने अशा उपक्रमांत हिरीरीने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या भेटीमुळे 'उडान' प्रकल्पाच्या टीमला नवी ऊर्जा मिळाली असून, पारनेर तालुका लवकरच बालविवाह मुक्त करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

# 'अहिल्यानगर ग्रंथोत्सव २०२५'चा उत्साहात शुभारंभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**प्रवरानगर** : ग्रंथ म्हणजे आयुष्याचे गुरूच. डिजिटल क्रांतीच्या युगात माध्यमे बदलली तरी वाचन संस्कृती कधीच थांबणार नाही, असा विश्वास शालिनीताई विखे यांनी व्यक्त केला.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित 'अहिल्यानगर ग्रंथोत्सव २०२५'चा शुभारंभ प्रवरानगर येथील खासदार बाळासाहेब विखे पाटील बहुउद्देशीय सभागृहात झाला. उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

जिल्ह्याला संतसाहित्याची समृद्ध परंपरा लाभल्याचे सांगत त्यांनी संत ज्ञानेश्वर यांच्या 'ज्ञानेश्वरी'चा उल्लेख केला. संत कवी महिपती महाराज व संत निळोबाराय यांच्या साहित्यवारशाचे जतन करणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील ४५७ ग्रंथालयांना ३ कोटी ९ लाखांचे अनुदान मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमस्थळी आकर्षक पद्धतीने पुस्तक प्रदर्शन मांडण्यात आले होते. विविध प्रकाशन संस्थांच्या पुस्तकांना विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध सार्वजनिक वाचनालयांचा तसेच ग्रंथवाचकांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

ग्रंथोत्सवानिमित्त भव्य ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एम. मगरे यांनी दुर्मिळ ग्रंथांचे डिजिटायझेशन महत्त्वाचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमस्थळी भव्य पुस्तक प्रदर्शन, ग्रंथदिंडी व विविध ग्रंथालयांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



### आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत

# प्रियज करपेचा रौप्य विजय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील मेहेकरी येथील कुस्तीपटू पैलवान प्रियज संतोष करपे याने थायलंडमध्ये नुकत्याच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत रौप्य पदक पटकाविले. या यशाबद्दल ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या हस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कार समारंभात प्रियज करपेच्या जिद्दीचा, चिकाटीचा आणि परिश्रमांचा गौरव करण्यात आला. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून स्वतःच्या मेहनतीच्या बळावर आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळवणे ही अभिमानास्पद बाब असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. प्रियज करपे हा मेहेकरी येथील क्रीडा लक्ष्य तालिममध्ये वस्ताद तात्या करपे यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचा सराव करीत आहे.यावेळी बोलताना ड. सदावर्ते म्हणाले की, प्रतिकूल परिस्थितीवर मात करत प्रियजने मिळवलेले यश युवकांसाठी प्रेरणादायी आहे. जिद्द, सातत्य आणि प्रामाणिक मेहनतीच्या जोरावर आंतरराष्ट्रीय पातळी गाठता येते, हे त्याने सिद्ध केले आहे. आजच्या तरुणांनी मोबाईल आणि आभासी दुनियेपासून दूर राहून क्रीडा, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात स्वतःला झोकून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.खेळाडूंना योग्य वेळी प्रोत्साहन आणि पाठबळ मिळणे आवश्यक असल्याचे सांगत ड. सदावर्ते यांनी प्रियज करपे याला १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले. समाजातील सक्षम घटकांनी अशा गुणवंत खेळाडूंना आर्थिक व नैतिक आधार देणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

प्रियज करपेने आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, हे यश माझ्या कुटुंबियांचे, प्रशिक्षकांचे आणि मला साथ देणाऱ्या सर्वांचे आहे. आगामी काळात देशासाठी सुवर्णपदक जिंकण्याचा संकल्प असल्याचे त्याने स्पष्ट केले.

# जिल्हा विकास समन्वय समितीच्या नामनिर्देशित सदस्यपदी अंजली ढेपे

तालुका प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : गेली अनेक वर्षांपासून जामखेडच्या सामाजिक. शैक्षणिक, राजकीय व क्रीडा क्षेत्राच्या विविध पदांच्या माध्यमातून तसेच विविध शासकीय समितीच्या माध्यमातून महिलांसाठी काम करत असलेल्या महारूळी गावच्या माजी सरपंच अंजली लक्ष्मण ढेपे यांची शासनाच्या जिल्हास्तरीय जिल्हा विकास समन्वय समिती (दिशा) या समितीच्या नामनिर्देशित सदस्यपदी निवड करण्यात आली असून समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले आहे. या निवडीबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

ही समिती केंद्रशासन व राज्य शासनाच्या योजना राबविण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचे नियोजन करत असते. या समितीचे अध्यक्ष हे शिर्डी मतदार संघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, सहअध्यक्ष नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके हे आहेत. तर सचिव म्हणून जिल्हाधिकारी हे काम पाहत असतात. या समितीत सर्व प्रमुख खात्यांच्या प्रमुख अधिकाऱ्यांचा समावेश असतो.

या समितीचे सहअध्यक्ष तथा नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांच्या शिफारशीनुसार अंजली ढेपे यांची या समितीवर निवड करण्यात आली आहे. अंजली ढेपे यांनी आतापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला विभागाच्या माजी तालुकाध्यक्ष, महारूळी गावच्या माजी सरपंच म्हणून काम केले असून सध्या त्या दक्षता समितीच्या तालुकाध्यक्ष, महिला समुपदेशन केंद्राच्या अध्यक्षा, तालुका विधि समितीच्या सदस्या व जामखेड तालुका कबड्डी असोसिएशनच्या सचिव अशा पदांवर काम करत आहेत.

# राहुरीत 'राजमाता जिजाऊ'महिला दिन उत्सव

## सहा दिवस विविध स्पर्धा व उपक्रमांची मेजवानी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : जागतिक महिला दिनानिमित्त राहुरी नगरपालिका व महिला बाल कल्याण समितीच्या वतीने 'राजमाता जिजाऊ' महिला दिन उत्सवाचे आयोजन ६ ते ११ मार्चदरम्यान करण्यात आले आहे. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम व उद्योजकतेला चालना देणारे उपक्रम या कालावधीत राबविण्यात येणार आहेत.

माजी नगराध्यक्षा डॉ. उषाताई तनपुरे, ओजस्विनी पतसंस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सुजाताताई तनपुरे, सोनालीताई तनपुरे व सायलीताई तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली यंदा प्रथमच महिलांसाठी मॅरेथॉन व क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय डान्स, रील कॉम्पिटेशन, पाककला, रांगोळी, फॅशन शो आदी स्पर्धांचा समावेश आहे. कार्यक्रम भागीरथीबाई तनपुरे कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे होणार आहेत.

महिला बाल कल्याण समितीच्या सभापती स्मिता भुजाडी यांनी सांगितले की, बचत गटांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ६ ते ११ मार्चदरम्यान दररोज दुपारी ३ ते ९ या वेळेत विशेष स्टॉल उभारले जाणार आहेत.

६ मार्च रोजी 'ॐकार भगवद्गीता' पठण, आरोग्य विषयक व्याख्यान व नृत्य स्पर्धा; ७ मार्च रोजी महिला मॅरेथॉन व 'संगीत रजनी'; ८ मार्च रोजी पाककला स्पर्धा व फनी गेम्स; ९ मार्च रोजी रांगोळी, आरोग्य तपासणी व 'खेळ पैठणीचा'; १० मार्च रोजी महिला क्रिकेट; तर ११ मार्च रोजी फॅशन शो व बक्षीस वितरण समारंभ होणार आहे.

महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# जातमुक्त ठराव घेतल्याबद्दल सौंदाळा ग्रामपंचायतीचा गौरव




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नेवासा तालुक्यातील मौजे सौंदाळा ग्रामपंचायतीने सामाजिक समतेच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल उचलत जातमुक्त ठराव मंजूर केला आहे. भारतीय संविधानाला अभिप्रेत असलेल्या समता, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांचा स्वीकार करत घेतलेल्या या निर्णयाबद्दल शाहू-फुले-आंबेडकर-साठे कलाम सामाजिक विचारमंचाच्या वतीने ग्राम पंचायतीचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांना भारतीय संविधानाची प्रत भेट देण्यात आली.

सामनगावच्या माजी सरपंच मीनाक्षी कांबळे यांच्या हस्ते सरपंच शरद आरगडे, ज्येष्ठ समाजसेवक बाबा आरगडे, भिवसेन गरड, सचिन आरगडे, लक्ष्मण आरगडे, बाळासाहेब आरगडे, भाऊसाहेब आरगडे तसेच ग्रामपंचायत सदस्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास विचारमंचाचे संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे, आरोग्य सेविका शालनताई जाधव, महिला अध्यक्षा उषाताई शिंदे, मिलिंद कांबळे, गणेश ढोबळे, सुनील सकट, युनूस पठाण, मोहम्मद पठाण, अर्शद पठाण, अमोल आहेर आदी मान्यवर उपस्थित होते.

संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे यांनी मनोगतात सांगितले की, सौंदाळा ग्रामस्थांनी गावात कुणाच्याही जातीचा उल्लेख करायचा नाही आणि फक्त माणूस हीच एकमेव जात मानायची, असा क्रांतिकारी निर्णय घेतला आहे. हा ठराव केवळ गावापुरता मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. यापूर्वीही गावात शिवी देणे बंदीचा ठराव संमत करून शिवी देणाऱ्यांवर दंडाची तरतूद करण्यात आली आहे. निराधार ज्येष्ठ नागरिकांसाठी दोन वेळच्या जेवणाची सोय तसेच मुलींच्या विवाहासाठी आर्थिक मदतीची योजना ग्रामपंचायतीमार्फत राबवली जात आहे.

माजी सरपंच मीनाक्षी कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख करत सांगितले की, संविधान निर्मितीच्या वेळी जात-धर्मापेक्षा राष्ट्रीयत्व श्रेष्ठ मानण्याचा संदेश देण्यात आला होता. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनंतरही समाजात जातीय बंधने कायम असताना सौंदाळा ग्रामपंचायतीने घेतलेला हा निर्णय संविधानपूरक आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा आहे.या निर्णयामुळे सौंदाळा गावाचे नाव राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत आले असून, सामाजिक समतेच्या दिशेने उचललेले हे पाऊल इतर गावांसाठीही मार्गदर्शक ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
रविवार, दि.०१ मार्च २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## गोमांस विक्री; एकास अटक, ४० किलो मांस जप्त

**श्रीरामपूर** : शहरातील टिळकनगर परिसरात गोमांस विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर श्रीरामपूर शहर पोलिसांनी कारवाई करत एका व्यक्तीस ताब्यात घेतले. या कारवाईत सुमारे ८ हजार २०० रुपयांचे अंदाजे ४० किलो गोमांस जप्त करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टिळकनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा यांच्या मागील परिसरात गोमांस विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार शहर पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला. पाहणीदरम्यान एका खोलीत गोवंशीय जनावरांचे कत्तल केलेले मांस विक्रीसाठी ठेवले असल्याचे आढळून आले. या प्रकरणी श्रीरामपूर शहरातील कुरेशी मोहल्ल्यात राहणारा आयान फिरोज कुरेशी यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून अंदाजे ४० किलो गोमांस जप्त करण्यात आले असून जप्त मालाची किंमत सुमारे ८ हजार रुपयांपेक्षा अधिक असल्याचे सांगण्यात आले. पोलीस कॉन्स्टेबल मच्छिंद्र कातखडे यांच्या फिर्यादीवरून आयान कुरेशी याच्याविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

### राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी
# १० मार्चला आचारसंहिता !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी विधानसभेचे विद्यमान आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या अकस्मात निधनामुळे रिक्त झालेल्या राहूरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी १० मार्चला आचारसंहिता लागू होण्याची शक्यता जवळपास निश्चित झाल्याची खात्रीलायक सूत्रांकडून समजली आहे.

राहुरी विधानसभा मतदार संघातून भाजपकडून उमेदवार निश्चित झाला नसला तरी सर्वे झालेल्या उमेदवारांचे समोर नाव येत असलेल्याने त्यांनाच त्यांनाच उमेदवारी दिली जाणार आहे. बारामती पॅटर्न वापरून राहुरी विधानसभेची जागा बिनविरोध करण्याची रणनिती भाजपकडून आखण्यात आली आहे. विशेष म्हणजे या मतदार संघातून आचारसंहितेपुर्वी होणारा भाजप प्रवेश मात्र लांबणीवर पडला असल्याची चर्चा होत आहे.



राहुरी विधानसभा मतदारसंघातील अंतिम मतदार यादी १४ फेब्रुवारीला जाहीर झाली असून यामध्ये एकूण मतदारांची संख्या ३ लाख ३२ हजार ९५२ असून यामध्ये १ लाख ७१ हजार ९८८ पुरुष तर १ लाख ६० हजार ९६३ महिला मतदारांचा समावेश आहे. या मतदार संघात राहुरी तालुक्यातील ६४, पाथर्डी तालुक्यातील ३८ तर अहिल्यानगर तालुक्यातील २४ अशा १२६ गावांचा समावेश आहे. प्रशासकीय पातळीवर या निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. निवडणुकीसाठी ३७४ मतदान केंद्र देखील निश्चित करण्यात आले आहेत. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार विद्यमान आमदारांचे निधन झाल्यानंतर सहा महिन्यात पोटनिवडणूक घेतली जाते. होणाऱ्या राहुरी विधानसभा मतदार संघातील पोट निवडणूक मोठ्या चुरशीची आणि रंगतदार होण्याची चिन्हे आता दिसू लागली आहे.

## खिडकी तोडून श्रीरामपुरात घरफोडी
### एक लाखाचा ऐवज लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील कामगार हॉस्पिटल परिसरात अज्ञात चोरट्यांनी खिडकीची चौकट उचकटून बंगल्यात प्रवेश करत सुमारे एक लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना शनिवारी (दि. २८ फेब्रुवारी) मध्यरात्री २.३० वाजेच्या सुमारास घडली.

आनंद पोपटलाल कोठारी यांच्या बंगल्याच्या मागील बाजूच्या खिडकीची चौकट कटावणीच्या साहाय्याने उचकटून चार चोरटे घरात शिरले. देवघर, स्वयंपाकघर व एका खोलीतील कपाटांची उचकापाचक करत त्यांनी सुमारे २० हजार रुपयांची रोकड, चांदीचे पैंजण व अन्य वस्तू असा अंदाजे ७५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. एकूण नुकसान सुमारे एक लाख रुपये असल्याचे सांगितले जात आहे.



घटनेच्या वेळी कोठारी हे बेडरूममध्ये झोपलेले होते. शेजारी राहणाऱ्या खाडे यांच्या मुलीला संशयास्पद आवाज ऐकू आल्याने तिने हाक दिली. त्यानंतर लाईट लावल्याचे पाहून चोरटे पळून गेले. जाताना त्यांनी खोलीला बाहेरून कडी लावली. दुसऱ्या दरवाजाने बाहेर येऊन कोठारी यांनी पाठलाग करण्याचा प्रयत्न केला असता चोरट्यांनी गलोलीने दगड मारण्याचा प्रयत्न केला.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये तोंडाला रुमाल बांधलेले चार संशयित दिसत आहेत. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विविध विकासकामांचे रविवारी भूमिपूजन व लोकार्पण
## पालकमंत्री राधाकृष्ण विखे, डॉ.सुजय विखे व आ.अमोल खताळ यांची प्रमुख उपस्थिती







**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी, हिवरगाव पावसा व संगमनेर खुर्द परिसरात विविध विकासकामांचा भव्य भूमिपूजन व लोकार्पण सोहळा रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी

राज्याचे जलसंपदामंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे. यावेळी भाजप प्रदेश उपाध्यक्ष आणि माजी खासदार डॉ. सुजयदादा विखे पाटील तसेच संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ पाटील यांची प्रमुख उपस्थिती मध्ये होणार आहे.

चंदनापुरी ते शिरापूर रस्त्यावर उभारण्यात येणाऱ्या ३ कोटी २४ लाख ७० हजार रुपये खर्चाच्या पुलाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या पुलामुळे परिसरातील वाहतूक सुलभ होणार असून शेतकरी व ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे.सी.आर. कम एस्केप कामाचे लोकार्पण सायंकाळी ५:३० वाजता होणार आहे तसेच हिवरगाव पावसा येथे निळवंडे प्रकल्पाच्या उर्ध्व प्रवरा उजवा कालवा (सा. क्र. ३५७३०) येथे १ कोटी ३२ लाख रुपये खर्चाच्या सी.आर. कम एस्केप कामाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे कालव्याच्या पाण्याचे व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार असून परिसरा तील शेतीला मोठा फायदा होणार आहे रायतेवाडी फाटा, संगमनेर खुर्द येथे बसविण्यात आलेले पथदिव्यांचे लोकार्पण सायंकाळी साडेसहा वाजता होणार आहे या पथदिव्यांमुळे रात्रीच्यावेळी वाहतूक अधिक सुलभ आणि सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.

या सर्व विकासकामांमुळे वरील गावाच्या परिसरातील पायाभूत सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण वाढ होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सर्व कार्यक्रमास महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन चंदनापुरी हिवरगाव पावसा रायतेवाडी संगमनेर खुर्द येथील महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## हनी ट्रॅप प्रकरणातील आरोपी दोन तासांत जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : आयुष्यभर प्रामाणिकपणे नोकरी व शेती करत जगलेल्या ६६ वर्षीय निवृत्त शेतकऱ्याच्या आयुष्यात एका फोन कॉलने मोठी खळबळ उडवली. 'अर्धनग्न व्हिडिओ व्हायरल करू' या धमकीने ते मानसिकदृष्ट्या हादरले; मात्र सोनई पोलिसांच्या तातडीच्या कारवाईमुळे त्यांना दिलासा मिळाला आणि हनी ट्रॅप मधून वाचण्यात त्यांना यश मिळाले.

हनी ट्रॅपद्वारे खंडणी उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीतील आरोपींना सोनई पोलिसांनी अवघ्या दोन तासांत जेरबंद केले. न्यायालयाने आरोपींना २ मार्च २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.



मुळा कारखाना, सोनई येथील अर्जुन मारुती ओव्हळ (वय ६६) यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन तक्रार मांडली. त्यांच्या सूचनेनुसार सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तक्रारीनुसार, एका महिलेने व्हिडिओ कॉल रेकॉर्डिंग व्हायरल करण्याची धमकी देत १० लाखांची मागणी केली. तसेच अनिकेत नेटके, किशोर साळवे, कृष्णा वैरागर व गौरव वाघमारे (रा. ब्राम्हणी, ता. राहुरी) यांनी फिर्यादीच्या घरी जाऊन धमकावून १० हजार रुपये उकळल्याचा आरोप आहे.

सहायक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ कारवाई करत आरोपींना ताब्यात घेतले. गुन्हा भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमान्वये दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ बाळासाहेब बाचकर करीत आहेत.

## घरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण


**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : एका अल्पवयीन मुलीचे रात्रीच्या सुमारास तीच्या राहत्या घरातून अपहरण करून तीला पळवून नेण्यात आले. ही घटना राहुरी तालुक्यातील पाथरे खुर्द परिसरात दि. २५ फेब्रुवारी रोजी सकाळच्या वेळी उघडकीस आली. एक १५ वर्षे ८ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी तीच्या कुटुंबासह राहुरी तालुक्यातील पाथरे खुर्द परिसरात राहते. दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी पिडीत मुलगी व घरातील इतर लोक जेवण करुन घरात झोपी गेले होते. दि. २५ फेब्रुवारी रोजी पहाटे ५.३० वाजे दरम्यान पिडीत मुलीची आई झोपेतुन उठल्या, तेव्हा त्यांना त्यांची मुलगी घरात दिसली नाही. मुलीच्या नातेवाईकांनी तीचा परिसरात व आजूबाजूला शोध घेतला. मात्र ती कोठेही आढळून आली नाही. या दरम्यान नातेवाईकांना समजले की, संदीप गांगुर्डे हा देखील घरी नाही. त्यानेच पिडीत मुलीला कशाचे तरी आमिष दाखवुन पळवुन नेले. अशी नातेवाईकांची खात्री झाली. पिडीत मुलीच्या आईने राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी संदीप नामदेव गांगुर्डे, रा. पाथरे खुर्द, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला श. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

### ईदसाठी कपडे घेण्यासाठी जाणाऱ्या
# दोन मित्रांचा अपघाती मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथील घटना ईद साठी कपडे खरेदी करण्यासाठी तिघे मित्र जात असताना त्यांच्या दोन दुचाकींना अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत दोघांचा मृत्यू झाला तर एक जण जखमी झाल्याची घटना तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ७५२ एच वर जरूळ फाटा जवळ घडली.



अयान रमजान शहा वय १९ वर्षे व अरमान शरीफ शेख वय १९ वर्षे दोघेही राहणार खंडाळा अशी अपघातातील दोघा मयत तरुणांची नावे आहे तर फैसल लाला खान वय २० वर्षे राहणार खंडाळा असे जखमी तरुणाचे नाव आहे.या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार अयान,अरमान,फैसल हे तिघे मित्र दुचाकीने ईद साठी कपडे घेण्याकरिता दोन दुचाकीवरून वैजापूरच्या दिशेने येत असताना जरूळ फाटा जवळ अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकींना धडक दिली.धडक इतकी भीषण होती की एका दुचाकीचे चाक तुटलेल्या अवस्थेत १००-१५० फुट लांबवर फकले गेले होते.अपघातानंतर रुग्णवाहिका चालक वाहेद पठाण यांनी जखमींना तातडीने वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले तेथे अयान याला दुपारी सव्वातीन वाजेच्या सुमारास वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून मृत घोषित केले तर फैसल व अरमान यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आले.जखमी अरमान याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथे हलवण्यात आले मात्र रुग्णालयात पोहचेपर्यंत त्याचाही मृत्यू झाला.अपघाताची माहिती मिळताच मित्र परिवार व नातेवाईकांनी उपजिल्हा रुग्णालयात मोठी गर्दी केली.या घटनेची वैजापूर पोलिसांत नोंद करण्यात आली आहे.

# कोपरगाव तालुक्यात बनावट खतांचा साठा उघड
## चौथ्या कारवाईत देर्डे-कोऱ्हाळे येथे छापा, पाचव्या कारवाईत सात दुकानावर व चार कंपन्यावर कारवाई ; सलग पाचवी कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : तालुक्यातील देर्डे-कोऱ्हाळे परिसरात एका गोडाऊनमध्ये बनावट खतांच्या गोण्यांचे पॅकिंग सुरू असल्याची गोपनीय माहिती कृषी विभागाला मिळाल्यानंतर मोठी कारवाई करण्यात आली. कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली गुण नियंत्रक निरीक्षक गणेश बीरदवडे यांनी ग्रामीण पोलीस उपनिरीक्षक कमलाकर चौधरी व त्यांच्या पथकासह छापा टाकला. छाप्यात गोडाऊनमध्ये प्रथमदर्शनी सुमारे ३०० खतांच्या गोण्या आढळून आल्या. पंचासमक्ष गोण्यांमधून नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. प्राथमिक तपासात विविध कंपन्यांच्या नावाने मोठ्या प्रमाणात खतांचा साठा केल्याचे निदर्शनास आले. ६ लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे शुक्रवारी तब्बल सात दुकानांवर व चार खत निर्मिती कंपन्यांवर कारवाई करत तब्बल २४४ बनावट खत गोण्या जप्त करत पाचवी कारवाई करण्यात आली आहे.या कारवाईत झींक अधिक बोरॉन ह्या खताचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यात असे खतच नसल्याचा अहवाल आला असुन त्यात झींक व बोरॉन आढळुन आले नाही.त्यामुळे हे खत असलेल्या सात दुकानावर व चार खत निर्मीती कंपन्यावर कोपरगाव पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. देर्डे कोऱ्हाळे येथील उद्धव अर्जुनराव शिलेदार यांच्या गोडाऊनवर छापा टाकण्यात आला. तेथे विविध कंपन्यांच्या नावाने सुमारे ३०० हून अधिक गोण्या आढळून आल्या. सुमारे ६ लाख १५ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात उद्धव शिलेदार यांच्याविरुद्ध खत नियंत्रण आदेश व अत्यावश्यक वस्तू कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कृषी विभागाने खत विक्रेत्यांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आदेश दिले असून बोगस खत विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. प्रयोगशाळेचा अहवाल आल्यानंतर संबंधितांवर अधिक कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी खत खरेदी करताना पक्के बिल घ्यावे, गोण्यांवरील तपशील तपासावा आणि संशयास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, कृषी विभागाच्या सलग कारवायांमुळे अवैधपणे बोगस खतांची साठवणूक व विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्र चालकांमध्ये खळबळ उडाली असून प्रशासनाने इतर ठिकाणीही तपास मोहीम तीव्र करण्याची गरज व्यक्त होत आहे.

### ■ कंपनीचा खुलासा
ज्या कंपनीच्या नावाच्या गोण्या आढळल्या, त्या कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन संबंधित खत आमच्या कंपनीचे नसल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे बनावट पॅकिंगद्वारे फसवणूक होत असल्याचा संशय अधिक गडद झाला आहे.

### ■ शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक
तालुक्यात बनावट खतांचा सुळसुळाट वाढल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. पिकांचे उत्पादन वाढावे आणि दर्जा सुधारावा या अपेक्षेने शेतकरी बाजारातून खत खरेदी करतात; मात्र काही विक्रेते निकृष्ट किंवा बनावट खत विकून शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशांवर डल्ला मारत असल्याचे उघड झाले आहे. बनावट खतामुळे पिकांची वाढ खुंटणे, उत्पादन घटणे आणि शेती खर्च वाढणे अशा समस्यांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर हा दुहेरी आघात ठरत आहे. अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत असल्याचे चित्र आहे.